


पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २२२ ■ गुरूवार, दि. १९ फेब्रुवारी २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com







शिवजयंतीनिमित्त शहरात विविध ठिकाणी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. शिवजयंतीच्या पृष्ठभूमीवर शिवरायांचे पूजन करतांना खा. अनुप धोत्रे. तसेच शहरातून मोठ्या उत्साहात काढण्यात आलेल्या शोभायात्रेत महिलांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होत लेझीमचे प्रात्यक्षिक सादर केले. तसेच भजनी मंडळ, पालखी असा हा अभूतपूर्व सोहळा होता.आरआरसी चॅनल व सिटी न्यूज सुपरफास्टच्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी शिवजयंती कार्यक्रम उत्साहात साजरा करीत शिवरायांना मानाचा मजुरा केला.

## राज्यभरात शिवजयंतीचा उत्साह....

# शिवनेरीवर शिवजन्मोत्सव सोहळा

### मुख्यमंत्री - दोन्ही उपमुख्यमंत्र्यांकडून मानवंदना





प्रतिनिधी १९ फेब्रुवारी

**शिवनेरी:** महाराष्ट्राचे आराध्य दैवत आणि हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची आज ३९६ वी जयंती राज्यभरात अत्यंत उत्साहात आणि भक्तीभावात साजरी होत आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे जन्मस्थान असलेल्या किल्ले शिवनेरीवर पहाटेपासूनच शिवभक्तांची मांदियाळी जमली असून 'जय भवानी, जय शिवाजी'च्या जयघोषाने आसमंत दुमदुमून गेला आहे.शिवनेरीवरील मुख्य शासकीय सोहळ्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार दाखल झाले आहेत. त्यांच्यासोबतच पर्यटनमंत्री शंभुराज देसाई, सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार आणि इतर अनेक मान्यवर महाराजांना अभिवादन करण्यासाठी शिवनेरीवर पोहोचले आहेत.

शिवजयंतीचे औचित्य साधून किल्ले शिवनेरीवर आणि विशेषतः शिवजन्म स्थळाच्या आतील भागात आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली आहे. गडाला ऐतिहासिक वारसा जपून विद्युत रोषणाईने उजळवून टाकण्यात आले आहे. या मंगलमयी सोहळ्याचे साक्षीदार होण्यासाठी आणि जन्मस्थळावर नतमस्तक होण्यासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून हजारो शिवभक्त गडावर दाखल झाले आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिवजयंतीनिमित्त बोलताना सांगितले की, अजितदादांना किल्ले शिवनेरीबद्दल विशेष जिव्हाळा होता. यापूर्वीच राज्य सरकारने छत्रपती शिवाजी महाराजांचे सर्व किल्ले अतिक्रमणमुक्त करण्याची घोषणा केली होती. त्या निर्णयानुसार काम सुरू असून पुणे जिल्ह्यातील सर्व किल्ले अतिक्रमणमुक्त करण्यात यश आले आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. शिवरायांचा ऐतिहासिक वारसा जपण्यासाठी आणि गड-किल्ल्यांचे संवर्धन करण्यासाठी सरकार कटिबद्ध असल्याचा पुनरुच्चार त्यांनी केला.

काळाच्या पुढे विचार करणारे युगपुरुष म्हणून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रेरणेतूनच आपला देश वाटचाल करत असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वप्नातील महाराष्ट्र साकार करण्यासाठी आपण त्यांच्या अंगातील एकतरी गुण अंगिकार करण्याची आवश्यकता असल्याचे शिंदे यांनी म्हटले आहे.कार्यक्रमास स्थानिक लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, अधिकारी व हजारो शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिवजन्मोत्सवाच्या निमित्ताने किल्ले शिवनेरी परिसरात उत्साह, अभिमान आणि ऐतिहासिक गौरवाचे वातावरण अनुभवास आले.मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी शिवकालीन परंपरा, लेझीम, ढोल-ताशांच्या गजरात आणि पारंपरिक वेशभूषेत सहभागी झालेल्या शिवप्रेमींमुळे संपूर्ण परिसर देशभक्तीच्या वातावरणाने दुमदुमून गेला.

### सुनेत्रा पवारांच्या पहिल्या शासकीय मनोगताने भावूक क्षण

महाराष्ट्राचे आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९६ व्या जयंतीनिमित्त किल्ले शिवनेरी येथे भव्य शासकीय सोहळा पार पडला. या कार्यक्रमात उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी प्रथमच शासकीय व्यासपीठावरून मनोगत व्यक्त केले. भाषण करताना त्या भावूक झाल्याचे दिसून आले. राज्यातील शेतकरी आणि कष्टकरी जनतेला सुखी-समाधानी ठेव. शिवरायांनी दाखवलेल्या वाटेवर चालण्याचे बळ आम्हा सर्वांना दे, अशी प्रार्थना त्यांनी आई शिवाई देवीच्या चरणी केली. शिवनेरीवर यापूर्वी अनेकदा वंदनासाठी आल्याचे सांगत त्यांनी आजचा दिवस विशेष आणि जबाबदारीची जाणीव करून देणारा असल्याचे नमूद केले. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी आपल्या भाषणात शिवनेरीच्या ऐतिहासिक महत्त्वावर प्रकाश टाकत, या पवित्र भूमीतून समाजात ऐक्य, स्वाभिमान आणि संस्कारांची जपणूक करण्याचे आवाहन केले. या वेळी अजित पवार यांच्या आठवणीमध्ये सुनेत्रा पवार भावुक झाल्या होत्या.

### शिवनेरी किल्ल्यावर चेंगराचेंगरीसदृश स्थिती

**पुणे :** जिल्ह्यातील किल्ले शिवनेरी येथे शिवजयंतीनिमित्त मोठ्या संख्येने शिवभक्तांनी रात्रीपासूनच गर्दी केली होती. त्यामुळे गडावर मोठी चेंगराचेंगरी झाल्याची धक्कादायक घटना घडली. गडावर जाणाऱ्या मार्गावर भाविकांची प्रचंड गर्दी उसळली होती. दरम्यान, प्रवेशद्वाराजवळ अचानक ढकलाढकली सुरू झाल्याने काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. या घटनेत काही शिवभक्त किरकोळ जखमी झाल्याची प्राथमिक माहिती मिळत असून त्यांना तात्काळ उपचारासाठी स्थानिक रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तसेच या चेंगराचेंगरीत महिला व लहान मुलंही जखमी झाले आहेत.

घटनेची माहिती मिळताच पोलीस व आपत्कालीन यंत्रणा घटनास्थळी दाखल झाल्या असून परिस्थिती नियंत्रणात आणण्यात आली आहे. सध्या गडावर गर्दीचे नियोजन करण्यासाठी अतिरिक्त पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. प्रशासनाकडून शिवभक्तांना संयम राखण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या घटनेमुळे शिवजयंती उत्सवाला गालबोट लागलं आहे. अंबरखाण्याच्या खालच्या हत्ती दरवाजा परिसरात तसेच गणेश दरवाजा या अरुंद मार्गांवर नागरिकांची प्रचंड गर्दी झाली. रस्ते अरुंद असल्याने आणि एकाचवेळी मोठ्या संख्येने भाविक पुढे सरकल्याने चेंगराचेंगरीची स्थिती निर्माण झाली.




# यवतमाळात पैशांच्या वादातून तरुणाची निर्घृण हत्या

प्रतिनिधी १९ फेब्रुवारी


**यवतमाळ :** पैशांच्या वादातून २४ वर्षीय तरुणाची लोखंडी सळईने डोक्यात वार करून निर्घृण हत्या करण्यात आली. ही घटना बुधवारी (दि. १८) रात्री साडेनऊच्या सुमारास वणी येथील बोकडे पेट्रोल पंपाजवळील संजय ऑटोमोबाईल दुकानासमोर घडली. या प्रकरणी वणी पोलिसांनी आरोपीस अटक केली आहे.मल्लेश संजय नेरकुंटलावार (वय २४, रा. दामलेफैल, वणी) असे मृत तरुणाचे नाव आहे. तर मंगेश उर्फ भुऱ्या विलास डाखरे (वय २६, रा. पळसोनी, ता. वणी) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मल्लेश व आरोपी मंगेश हे दोघे जिवलग मित्र होते.


काही दिवसांपूर्वी दोघेही मध्यप्रदेशातील पचमढी येथे फिरून आले होते. त्या दरम्यान मल्लेशने मंगेशला ७ हजार रुपये उसने दिले होते. हे पैसे परत देण्यावरून दोघांमध्ये वाद सुरू होता. बुधवारी दुपारीही त्यांच्यात पैशांवरून जोरदार वाद झाल्याचे सांगण्यात येते. दरम्यान, बुधवारी रात्री साडेनऊच्या सुमारास मंगेश हा संजय ऑटोमोबाईल दुकानासमोर मल्लेशला लोखंडी सळईने मारहाण करीत असल्याची माहिती मल्लेशचा भाऊ राजेश नेरकुंटलावार याला नातेवाईकाकडून फोनवर मिळाली. राजेश घटनास्थळी पोहोचला असता आरोपीने मल्लेशच्या डोक्यात लोखंडी सळईने वार करून गंभीर जखमी केले होते. घटनेनंतर परिसरात नागरिकांची गर्दी होताच आरोपी तेथून पसार झाला.घटनेची माहिती मिळताच पोलिस कर्मचारी सचिन वांढरे यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत मल्लेशला वणी येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.या प्रकरणी राजेश संजय नेरकुंटलावार यांच्या फिर्यादीवरून वणी पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम १०३(१) अन्वये खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.









# सिटी न्यूज अमरावती

गुरुवार, दि. १९ फेब्रुवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com


## अमरावती येथील पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्यात; ११३ उमेदवारांची विविध पदांवर प्राथमिक निवड

**अमरावती:** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि मॉडेल करिअर सेंटर, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच स्थानिक जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र अमरावती कार्यालयाच्या आवारात 'पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे (प्लेसमेंट ड्राईव्ह) आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यास जिल्ह्यातील उमेदवारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लागला. त्यानुसार एकूण ९१ रिक्त पदांसाठी ऑनलाईन/ऑफलाईन १९६ उमेदवारांनी सहभाग नोंदवून त्यापैकी १७८ उमेदवारांनी प्रत्यक्ष येऊन मुलाखती दिल्या व मुलाखती दिलेल्या उमेदवारापैकी ११३ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली. या मेळाव्यात नामांकित खासगी आस्थापनांच्या प्रतिनिधींनी उमेदवारांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेतल्या. यामध्ये इंदिराबाई मेघे महाविद्यालयाचे प्राचार्य अजय कोल्हे, डाटानोवा टेक्नॉलॉजी प्रा.ली. चे निशांत गिरी, भारतीय महाविद्यालयाचे आवारे, जिओ स्टोअर चे महेश कुंभार, हितेश गावंडे, सचिन निचले, शुभम ठवकर या उद्योजकांनी उपस्थित राहून निवड प्रक्रिया पार पाडली.





**अमरावती:** छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती निमित्त डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी जल्लोषात वाजत गाजत रॅली काढली. विधी महाविद्यालयापासून तर डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय (पी डी एम सी ) पर्यंत सदर रॅली काढण्यात आली. प्राचार्य डॉक्टर वर्षा देशमुख व त्यांच्या सर्व टीमने कार्यक्रमाचे सुंदर नियोजन केले होते.

## गडगडेश्वर मंदिर येथे महाशिवरात्री उत्सवाला भक्तांचा मोठा प्रतिसाद

प्रतिनिधी १९ फेब्रुवारी

**अमरावती :** महाशिवरात्री निमित्त गडगडेश्वर मंदिरात धार्मिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडले. पहाटेपासूनच भाविकांची मोठी गर्दी मंदिरात पाहायला मिळाली. भगवान शिवाच्या दर्शनासाठी भक्तांनी लांबच लांब रांगा लावल्या होत्या. दिवसभर अभिषेक, पूजा-अर्चा तसेच भजन-कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते. त्यामुळे संपूर्ण मंदिर परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला होता.

या उत्सवाची सुरुवात काही दिवसांपूर्वीच झाली होती. १२ तारखेपासून पारंपरिक पद्धतीने शिव-पार्वती विवाह सोहळ्याची सुरुवात करण्यात आली. १३ तारखेला हळदीचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. १४ तारखेला मध्यरात्री १२ वाजल्यापासून शिव-पार्वती विवाह सोहळा साजरा करण्यात आला. या सर्व कार्यक्रमांमुळे भाविकांमध्ये विशेष उत्साह दिसून आला आणि भक्तिमय वातावरण निर्माण झाले.

मंदिर परिसरात भाविकांसाठी प्रसाद वाटपाची व्यवस्था करण्यात आली होती. भाविकांनी श्रद्धेने दर्शन घेत धार्मिक कार्यक्रमात सहभाग घेतला. प्रशासन आणि मंदिर समितीने भाविकांच्या सोयीसाठी आवश्यक व्यवस्था केल्याने सर्व कार्यक्रम सुरळीत पार पडले.

दरम्यान, १६ तारखेला मंदिरात महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून मोठ्या संख्येने भाविकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. महाशिवरात्री निमित्त परिसरात भक्ती, उत्साह आणि धार्मिकतेचे वातावरण पाहायला मिळत आहे.

## अमरावतीत भीषण अपघातात पाच ठार, दोन गंभीर!

### ♦ शिवाई बसची ऑटोरिक्षाला धडक; वरुड-राजुरा बाजार मार्गावरील घटना

प्रतिनिधी १९ फेब्रुवारी

**अमरावती :** राज्य परिवहन महामंडळाच्या शिवाई ई-बस आणि प्रवासी ऑटोरिक्षाच्या समोरासमोर झालेल्या भीषण धडकेत पाच जणांचा मृत्यू झाला. वरुड-राजुरा बाजार मार्गावरील रेल्वे क्रॉसिंगजवळ बुधवारी सकाळी १०.३० वाजताच्या सुमारास हा अपघात घडला. अपघात इतका भीषण होता की, ऑटोरिक्षातील चौघांचा घटनास्थळीच, तर एकाचा नागपुरात उपचारादरम्यान मृत्यू झाला.

ऑटोचालक कैलाश घनश्याम नागदिवे (४२) रा. वाडेगाव), चिंतामण सदाशिव नागदिवे (६०, रा. वाडेगाव), माही प्रवीण मांगूळकर (१३, रा. वाडेगाव), हरिभाऊ दौलत शिंदे (८३, रा. जरूड) व राजकुमार भलावी (५५, रा.



गव्हाणकुंड) अशी मृतकांची नावे आहेत. प्रतिभा प्रकाश लाड (१८) आणि मोहिनी वंदे भोरे (१८, रा. राजुरा बाजार) या दोघी गंभीर जखमी असून, त्यांच्यावर नागपूर येथे उपचार सुरू आहेत. त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजते.एसटी महामंडळाची एमएच ४९, बीझेड ९४३६ या क्रमांकाची शिवाई बस वरुड बसस्थानकातून वर्ध्याकडे निघाली होती. त्याचवेळी एमएच २७ एआर १८२३ क्रमांकाची ऑटोरिक्षा काही विद्यार्थी व प्रवाशांना घेऊन वरुडकडे येत होती. वरुडपासून सुमारे दोन किलोमीटर अंतरावर असलेल्या रेल्वे क्रॉसिंगनजीक भरधाव बसने समोरून येणाऱ्या ऑटोरिक्षाला धडक दिली. क्षणार्धात ऑटोरिक्षा रस्त्याच्या कडेला फेकल्या गेली. अपघातानंतर काही काळ वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती. घटनास्थळी नागरिकांची मोठी गर्दी जमली. जखमींना तात्काळ वरुड ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात आले. प्रकृती गंभीर असल्याने त्यांना नागपूरला हलविण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान भलावी यांची प्राणज्योत मालवली. दरम्यान, वरुड पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून मृतदेह ग्रामीण रुग्णालयात पाठविले. बसचालक निखिल रामभाऊ वरठी (२६, रा. तळेगाव), श्यामजी पंत (आष्टी, जि. वर्धा) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून ताब्यात घेण्यात आले आहे. बस भरधाव होती आणि चालकाचे नियंत्रण सुटल्याने हा अपघात घडल्याची प्राथमिक माहिती आहे.

## 'जनसंवाद' मध्ये १२०० नागरिकांनी मांडल्या समस्या

### ♦ जनसंवाद' ला जिल्ह्यात मिळाला उत्स्फुर्त प्रतिसाद

प्रतिनिधी १९ फेब्रुवारी

**अमरावती :** पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकाराने जिल्ह्यात 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान' प्रभावीपणे राबवण्यात येत आहे. या अभियानांतर्गत जिल्हा प्रशासनाच्या वतीने नागरिकांच्या समस्या निवारणासाठी आज एकाच दिवशी तालुकास्तरावर 'जनसंवाद व तक्रार निवारण' कार्यक्रम पार पडला. जिल्ह्यातील १४ तालुक्यात ११९७ तक्रारी प्रत्यक्ष येऊन समस्या मांडल्यात. यातील १३७ तक्रारींवर जागेवरच समाधान करण्यात आले.

जिल्ह्यातील आज पार पडलेल्या तालुकास्तरीय जनसंवाद व तक्रार निवारण कार्यक्रमात नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहायला मिळाला. अमरावती तालुक्यात ५२, तिवसा ३५, भातकुली ५६, दर्यापूर ८५, अंजनगाव सुर्जी १२३, अचलपूर ७६, चांदुर बाजार ४८, धारणी ४३, चिखलदरा ८०, मोर्शी ७६, वरूड ११०, चांदुर रेल्वे १३६, धामणगाव रेल्वे १३४, नांदगाव खंडेश्वर ४३ अशा एकुण ९९७ तक्रारी नागरीकांनी दाखल केल्या.

अचलपूर येथे आमदार प्रविण तायडे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक प्रिती देशमुख, उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव, मोर्शी येथे उपजिल्हाधिकारी प्रसेनजित चव्हाण, नांदगाव खंडेश्वर येथे उपविभागीय अधिकारी अनिल भटकर, तहसिलदार अश्विनी जाधव, अमरावती येथे निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे, जिल्हा पुरवठा अधिकारी निनाद लांडे, तहसिलदार विजय लोखंडे आदींनी या कार्यक्रमात सहभाग नोंदविला.

धारणी तहसील कार्यालयाच्या नवीन प्रशासकीय इमारतीत जनसंवाद कार्यक्रम पार पडला. यात ग्रामीण ते शहरी भागातील नागरिकांनी विविध विभागांशी संबंधित समस्या थेट प्रशासनासमोर मांडल्या. विशेषतः वीज वितरण, जिल्हा परिषदेचा ग्रामीण पाणीपुरवठा, जलसंधारण, महसूल, शिक्षण, घरकुल योजना, पुनर्वसन, तसेच गॅस वितरणाशी निगडीत तक्रारींचा समावेश होता.

धारणी येथील कार्यक्रमात मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, धारणी नगरपंचायत अध्यक्ष सुनील चौथमल, उपजिल्हाधिकारी ज्ञानेश्वर घ्यार, जिल्हा जलसंधारण अधिकारी सुनिल जाधव, तहसिलदार प्रदीप शेवाळे, गटविकास अधिकारी विजय गायकवाड आदी उपस्थित होते. नागरिकांनी शासन दरबारी आपल्या तक्रारी अधिकृतपणे नोंदविल्या. मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती महापात्र यांनी प्राप्त तक्रारींचा आढावा घेत संबंधित विभागांशी समन्वय साधून तात्काळ निकाली काढण्याचे निर्देश दिले. या उपक्रमात नागरिकांच्या समस्या थेट प्रशासनापर्यंत पोहोचविण्याची संधी मिळाल्याने समाधान व्यक्त करण्यात आले. जनसंवादाच्या माध्यमातून प्रशासन आणि नागरिक यांच्यातील दरी कमी करण्याचा प्रयत्न होत आहे.

जनसंवाद कार्यक्रमात नागरिकांच्या वैयक्तिक आणि सार्वजनिक तक्रारी, विविध विकास कामांची सद्यस्थिती, प्रलंबित प्रस्ताव आणि स्थानिक पातळीवरील महत्त्वाच्या प्रश्नांचा सविस्तर आढावा घेतला गेला. तसेच तहसील, जिल्हा परिषद, तालुक्यातील सर्व विभागांचे अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी, ग्रामसचिव आणि कृषी सहाय्यकांनी उपस्थिती दर्शवून नागरिकांच्या समस्या निकाली काढण्यासाठी प्रयत्न केले.

जिल्हा प्रशासनाने तालुकास्तरीय जनसंवाद व तक्रार निवारण कार्यक्रम सुरळीत पार पाडण्यासाठी समन्वयक अधिकारी नेमून त्यांना तालुकानिहाय जबाबदारी सोपवली होती. त्यांच्या मार्गदर्शनात नागरिकांच्या समस्या जाणून घेण्यात आल्या.

## अवैधरित्या मॅफेडॉन (एम.डी.) ची विक्री करणाऱ्या इसमावर धडक कारवाई

प्रतिनिधी १९ फेब्रुवारी

**अमरावती :** पोलीस आयुक्त यांचे अमरावती शहरातील अवैधरित्या अंमली पदार्थ विकी, वाहतुक करणाऱ्या इसमांवर प्रभावी कार्यवाही करण्याबाबत आदेश प्राप्त झालेवरून पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण, गुन्हे शाखा अमरावती शहर यांचे नेतृत्वात पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी गुप्त बातमीदार नेमुन खालील प्रमाणे कार्यवाही केली.

१९/०२/२०२६ रोजी गुन्हेशाखा चे पथक हे आयुक्तालय हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना पेट्रोलींग दरम्यान गुप्त बातमीदाराकडुन खात्री लायक



माहीती मिळाली की, एक इसम हा मोपेड मोटर सायकल वरती आपले जवळ अवैध्यरित्या मैथेडॉन (एम.डी.) नावाचा अंमली पदार्थ बाळगुण विक्री करण्याचे इरादयाने येत आहे. अशा खात्री लायक माहीती वरून पो.नि. संदिप चव्हाण यांचे नेतृत्वात गुन्हे शाखेच्या पथकाने आदर्श हॉटेल ते चौधरी चौक दरम्याण सापळा रचुन पो. स्टाफ च्या मदतीने नमुद इसम नामे सैयद नाझिम सैयद कासीम, वय ३५ वर्ष रा. पटवा चौक मंसानगंज अमरावती यास मोपेड मोटर सायकल सह ताब्यात घेतले. त्याचे ताब्यातुन ११.३९० ग्रॅम (एम.डी.) मॅफेडॉन पाउडर किं.अ. १,११,९०० /- रू तसेच गुन्हयात वापरलेली मोपेड मोटर सायकल व मोबाईल असा एकूण किं.अ. २,०१,९०० /- रू चा मुद्देमाल मिळुन आल्याने ते जप्त करून नमुद आरोपी विरूध्द पोलीस स्टेशन सिटी कोतवाली येथे अप.

### अमरावती शहर गुन्हेशाखेची कारवाई

कं ५९/२०२६ कलम ८ (क), २१ (ब), २२ (ब), २९ एन.डी.पी.एस. ॲक्ट प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ताब्यात घेण्यात आलेल्या इसमाचे नाव सैयद नाझिम सैयद कासीम, वय ३५ वर्ष रा. पटवा चौक मंसानगंज अमरावती असे आहे.

जप्त मुददेमाल मध्ये ११.३९० ग्रॅम(एम.डी.)मॅफेड्रॉन पाउडर किं.अ. १,११,९०० /- रू २) होन्डा डिओ मोपेड क्र. एम. एच-२७-सिई-७८१३ कि.अं. ८०,०००/- रू ३) आय क्यु कंपनीा मोबाईल किं.अ. १०,०००/-

असा एकूण, २,०१,९००/- रू चा मुददेमाल जप्त केले.

नमुद अटक आरोपींनी सदरची एम.डी. ही कोणाकडून खरेदी केली तसेच सदर ची एम.डी ही अमरावती शहरातध्ये कोठून आली याबाबत सविस्तर तपास गुन्हे शाखा यांचे मार्फत सुरू असून त्यांनाही लवकरच अटक करण्यात येईल तसेच अमरावती शहरात एम.डी. बाळगणारे त्याचे सेवन करणारे, विक्री करणारे यांचेबाबत गोपनिय माहीती काढण्यात आली असून त्यांच्यावरही नजीकच्या काळात धडक मोहीम राबविण्याबाबत मा. पोलीस आयुक्त अमरावती शहर यांनी आदेशीत केले आहे.

## जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे आधार अपडेट प्रलंबित

### ♦ कर्जमाफीच्या लाभासाठी तातडीने संपर्क साधण्याचे आवाहन

प्रतिनिधी १९ फेब्रुवारी

**अमरावती:** राज्य शासनाकडून शेती क्षेत्रात सुधारणा करण्यासाठी आणि शेतकऱ्यांना कर्जमुक्त करण्यासाठी प्रस्तावित कर्ज निवारण योजनेची अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर, अमरावती जिल्ह्यातील थकीत कर्जदार शेतकरी सभासदांची माहिती संकलित करण्याचे काम सुरू आहे. मात्र, अद्यापही जिल्ह्यातील सुमारे ३ हजार २९४ शेतकरी सभासदांचे आधार क्रमांक प्राप्त झाले नसल्याने त्यांच्या कर्जमाफीच्या प्रक्रियेत तांत्रिक अडथळा निर्माण झाला आहे.

शासनाच्या प्रस्तावित कर्जमाफी पोर्टलवर अमरावती जिल्ह्यातील एकूण ७३ हजार ४१३ खाती नोंदवण्यात आली आहेत. यापैकी प्राथमिक कृषी पत पुरवठा सेवा सहकारी संस्थांचे १ हजार ४५० थकीत कर्जदार आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या शाखा स्तरावरील १ हजार ८४४ कर्जदार अशा एकूण ३ हजार २९४ सभासदांची आधार कार्ड माहिती अद्याप अप्राप्त आहे. विहित नमुना प्रपत्र 'अ' व 'ब' मध्ये ही माहिती भरण्याचे काम सध्या सेवा सहकारी संस्था आणि बँक स्तरावर सुरू आहे.

ज्या शेतकऱ्यांचे आधार क्रमांक प्रलंबित आहेत, त्यांनी ही प्रक्रिया पूर्ण न केल्यास त्यांना प्रस्तावित योजनेच्या लाभापासून वंचित राहावे लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे अमरावती जिल्ह्यातील संबंधित सर्व शेतकरी सभासदांनी आपल्या संस्थेचे सचिव, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे वसुली अधिकारी किंवा तालुका उप/सहायक निबंधक कार्यालयाशी तातडीने संपर्क साधावा. संपर्काच्या वेळी आपले आधार कार्ड व आवश्यक कागदपत्रे सादर करून आपली माहिती अद्ययावत करावी, असे आवाहन विभागीय सहनिबंधक आणि जिल्हा उपनिबंधक शंकर कुंभार यांनी केले आहे.

## 'शेतकरी-महिला संवाद' कार्यक्रमाचे आयोजन

### ♦ कापुसतळणीत शुक्रवारी 'गाव भेट उपक्रम'

प्रतिनिधी १९ फेब्रुवारी

**अमरावती:** महसूल विभागातर्फे शुक्रवार, दि. २० फेब्रुवारी रोजी सकाळी १०.३० वाजता 'गाव भेट उपक्रम २०२६' अंतर्गत ग्रामपंचायत कार्यालय, कापुसतळणी, ता. अमरावती येथे शेतकरी व महिला संवाद कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविला जात आहे.

यावेही आमदार राजेश वानखडे, अमरावतीचे उपविभागीय अधिकारी अनिल भटकर, तहसीलदार विजय लोखंडे उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमात महिलांच्या आरोग्यासाठी कॅन्सर तज्ज्ञ डॉ. अरोरा हे 'महिला संबंधित कर्करोग' यावर मार्गदर्शन करणार आहेत.

शिबिरादरम्यान विविध लोकोपयोगी उपक्रम राबवले जाणार आहेत, ज्यात प्रामुख्याने गावात स्वच्छतेचा संदेश देण्यासाठी स्वच्छता दिंडीचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच महिलांच्या आरोग्यासाठी विशेष तपासणी शिबीर, नागरिकांच्या महसूल विभागाशी संबंधित तक्रारींचे जागीच निवारण, शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेऊन त्यांना मार्गदर्शन, जनावरांच्या आरोग्यासाठी तपासणी व मार्गदर्शन करण्यात येणार आहे. कार्यक्रमाला परिसरातील नागरिक, शेतकरी आणि महिलांनी उपस्थित राहावे, असे आवाहन राजस्व मंडळ डवरगाव आणि तहसील कार्यालय, अमरावती यांनी केले आहे.

## पाचव्या आई-महोत्सवात ३ मे ला संत अच्युत महाराज साहित्य संमेलन

प्रतिनिधी १९ फेब्रुवारी

**दर्यापूर :** आपल्या अभिनव आयोजनाने संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष केंद्रीत करणारा दर्यापूर येथील आई महोत्सव या बहुआयामी कार्यक्रमाचे आयोजन दि १ मे ते ११ मे या दरम्यान दर्यापूर येथे करण्यात आले असून या महोत्सवात दि ३ मे या दिवशी एक दिवसीय तिसरे संत अच्युत महाराज साहित्य संमेलन संपन्न होत आहे . या संमेलनाच्या अध्यक्षपदी ब्रम्हलीन संत अच्युत महाराज यांचे परमशिष्य ह भ प ॲड. संत सचिन देव महाराज उपस्थिती देऊन आपल्या अमृत तुल्य वाणीने संबोधीत करणार आहेत. स्थानिक गाडगेबाबा मंडळाच्या वतीने या बहुप्रतिक्षीत आई महोत्सवाचे आयोजन दर्यापूर येथे करण्यात येत असते . दर्यापूर येथे आपल्या वार्षिक महाशिवरात्री प्रबोधन सप्ताहात उपस्थित संत सचिन देव महाराज यांचा यथोचित सत्कार करून आई महोत्सव संकल्पनेचे जनक तथा गाडगेबाबा मंडळाचे संस्थापक प्रा गजानन भारसाकळे यांनी महाराजांना संमेलनाचे अध्यक्षपद भूषविण्याची तथा संमेलन आयोजन परवानगीची प्रार्थना केली .या प्रसंगी दर्यापूर-बनोसा- बाभळी संत अच्युत महाराज सत्संग मंडळाचे अध्यक्ष ॲड. किरण मोकासदार , सौ अपर्णाताई मोकासदार , महाराजांचे दैनंदिन सहकारी बंडूभाऊ गावंडे , एकनाथ देवळे , शुभम देवळे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती . संत अच्युत महाराजांचा प्रबोधनपर साहित्य निर्मितीचा व्यासंग अतिशय प्रचंड असून त्यांचे द्वारे ग्रंथ व पुस्तक निर्मितीचे अलौकीक कार्य घडल्याने या सर्व साहित्याला साहित्य संमेलना द्वारे उजाळा देऊनच मानवंदना दिल्या जाऊ शकते यासाठी या संमेलनाचे आयोजन असल्याचे प्रा भारसाकळे यांनी या प्रसंगी विषद केले . या अगोदरचे दोन्ही साहित्य संमेलने हे अमरावती येथे पार पडले असून या तिसऱ्या साहित्य संमेलनाच्या निमित्याने संत अच्युत महाराजांच्या निष्काम कार्याची ज्योत अखंडपणे तथा प्रखरतेने तेवत ठेवणारे संत ॲड. सचिन देव महाराज यांच्या कर्मयोगी कार्यावर प्रकाश टाकणारा एक गौरव ग्रंथ प्रकाशीत होणार असून संत अच्युत महाराजांचे देश विदेशभर पसरलेल्या भाविक भक्तांनी या ग्रंथात लिखाण करण्याची संधी या संमेलनाद्वारे प्राप्त होणार आहे . तसेच या निमित्याने विविध स्पर्धांचेही नियोजन करण्यात येत आहे .या दिवशी स्थानिक रामदेव बाबा मंदीर परिसरापासून साहित्य संमेलन आयोजन स्थळापर्यंत महाराजांच्या ग्रंथ साहित्य दिंडी - पालखी मिरवणुकीचे सुद्धा आयोजन करण्यात येणार आहे .

या निमित्याने पुनःच्य एकदा अमरावती येथील संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे अच्युत महाराजांच्या भरीव तथा लोक कल्याणकारी साहित्य निर्मिती निमित्य लक्ष केंद्रीत करून त्यांना मरणोत्तर डी . लिट . पदवी मिळण्याची मागणी करण्यात येणार आहे .

## वडिलांनी दिली किडनी; मुलाला मिळाले नवजीवन

**अमरावती :** अमरावती येथील सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये एक हृदयस्पर्शी घटना घडली. गणेश गोविंदराव घुरडे यांनी आपल्या मुलगा प्रतिक गणेश घुरडे याला किडनी दान करून त्याचे प्राण वाचवले. प्रतिक गेल्या काही काळापासून किडनीच्या आजाराने त्रस्त होता आणि त्याच्यावर नियमित डायलिसिस सुरू होते.

मुलाच्या भविष्यासाठी व त्याला नवजीवन देण्यासाठी वडिलांनी स्वतःची एक किडनी देण्याचा निर्णय घेतला. डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली ही शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पडली. महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत ही शस्त्रक्रिया करण्यात आली.

या शस्त्रक्रियेसाठी हॉस्पिटलमधील डॉक्टर, वैद्यकीय अधिकारी, नर्सिंग स्टाफ व इतर कर्मचाऱ्यांनी विशेष मेहनत घेतली. त्यांच्या सहकार्यामुळेच ही जटिल शस्त्रक्रिया यशस्वी झाली.

## अमरावती शहरात वाहतूक नियमांमध्ये बदल

### ♦ पर्यायी मार्गाचा वापर करण्याचे आवाहन

प्रतिनिधी १९ फेब्रुवारी

**अमरावती :** अमरावती शहरात चित्रा चौक ते नागपूरी गेट उड्डाणपुलाचे उर्वरित बांधकाम नियोजनबध्द पध्दतीने पुर्ण करण्यासाठी आज दि. १८ फेब्रुवारी ते ४ मार्च २०२६ पर्यंत वाहतूक नियमांमध्ये बदल करण्यात आले आहेत. यासाठी पोलीस उपायुक्त रमेश धुमाळ यांनी अधिसूचना जारी केली आहे.

**सर्व वाहनांना वाहतूकीसाठी बंद करण्यात येणारे मार्ग**

टांगा पडाव ते नागपूरी गेट चौक पर्यंत सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंदी पादचारीसह. चित्रा चौक ते नागपूरी गेट सर्व प्रकारचे जड व हलके मालवाहु तसेच बसेस इत्यादी वाहनांना प्रवेश बंदी राहील.

**वाहतूकीस पर्यायी मार्ग**

टांगा पडाव-जवाहर गेट-सक्करसाथ-नागपूरी गेट. दिपक चौक-चौधरी चौक-आदर्श हॉटेल-पिंजारा मस्जिद मार्गे नागपूरी गेट. फक्त दुचाकी, कार, ऑटोसाठी लागू राहील. इतर सर्व वाहनांना प्रवेशबंदी राहील.

वाहतूक परिस्थितीनुसार वाहतूक थांबविणे व वळविणे याबाबत सर्व अधिकार वाहतूक विभागास राहील. तसेच अत्यावश्यक वेळी जनहित लक्षात घेता सहायक पोलीस आयुक्त वाहतुक अमरावती शहर यांना कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टिकोनातून नियोजित अधिसूचनेमध्ये वाहतूकीच्या नियमनाबाबत अंशत: बदल करण्याचे अधिकार राहील.

या अधिसूचनेचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालक, वाहनधारकांवर मोटर वाहन अधिनियम आणि महाराष्ट्र पोलीस अधिनियमानुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

सिटी न्यूज अकोला
गुरुवार, दि. १९ फेब्रुवारी २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## सत्तरीपुढील व्यक्तींना उपचारांसाठी 'वय वंदना कार्ड'; जिल्ह्यात गावोगाव मोहिम राबविणार

**अकोला:** एकत्रित आयुष्मान भारत योजना-प्रधानमंत्री जनआरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना अंतर्गत ७० वर्षांपुढील व्यक्तींसाठी 'वय वंदना कार्ड' मोहिम जिल्ह्यात हाती घेण्यात आली आहे. त्याचा लाभ घेण्यासाठी संबंधित नागरिकांनी जिल्ह्यात सेतू केंद्रे किंवा आपल्या गावातील आशासेविकांशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. वयाची ७० वर्ष पूर्ण झालेल्या किंवा त्यावरील वयाच्या व्यक्तींना या योजनेचा लाभ मिळणार आहे. वय वंदना कार्डधारकांना अंगीकृत रूग्णालयात ५ लाख रू. चे वार्षिक विमा कवच दिले जाणार आहे. आयुष्मान कार्डधारकांना ५ लाख रू. प्रतिकुटुंब प्रतिवर्ष विनामूल्य उपचार मिळतो. तथापि, गंभीर आजारांच्या ज्येष्ठ नागरिकांना वेळोवेळी उपचारांची गरज भासू शकते. अशा ७० वर्षांवरील रूग्णांना वय वंदना कार्डद्वारे अतिरिक्त उपचार घेता येतात.

## जिल्हास्तरीय लोकशाही दिन २ मार्च रोजी

**अकोला:** पुढील महिन्यातील जिल्हास्तरीय लोकशाहीदिन दि. २ मार्च रोजी सकाळी ११ वा. जिल्हाधिकारी कार्यालयात होणार आहे. दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिन व दिव्यांग लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. सामान्य नागरिकांनी तसेच दिव्यांग नागरिकांनी जिल्हास्तरीय लोकशाही दिनामधील तक्रार अर्ज (तालुका लोकशाही दिनानंतर) विहीत नमुन्यात लोकशाहीदिनाच्या १५ दिवस आधी दोन प्रतीत पाठविणे आवश्यक आहे.

## अडगाव जळीत प्रकरणातील फरार आरोपींना अटक करा

**हिवरखेड:** अडगाव येथे तिघांच्या दुर्दैवी मृत्यूला कारणीभूत असलेले आरोपी मात्र घटनेपासून फरार आहेत. त्यांचा त्वरित शोध घेऊन कडक शिक्षा करा अशी मागणी होत आहे. बुधवारी एका शिष्टमंडळाने पोलिस अधीक्षकांकडे या बाबतीत मागणी केली. या प्रकरणात अजमत खा रहेमत खा अडगाव बु. आणि सय्यद मकसूद अली रा. हिवरखेड आणि जुबेर रा. बाळापूर यांना गंभीर गुन्ह्यात आरोपी करण्यात आले आहे. या प्रकरणात आरोपींच्या संख्येत वाढ झाली आहे.

# महिला नगराध्यक्ष असूनही शहरात महिलांची कुचंबणा

प्रतिनिधी १९ फेब्रुवारी

**तेल्हारा:** शहरात सर्वत्र घाणीचे साम्राज्य निर्माण झाले असून नगर परिषदेचे याकडे पूर्णपणे दुर्लक्ष असून नगरपालिकेला स्वच्छते करिता जो लाखो रुपयांचा निधी प्राप्त होत आहे त्या निधीच्या माध्यमातून नगरपालिका कोणाचा विकास करीत आहे हा प्रश्न आहे.

नगर परिषदचा परिसर मुत्रीघर बनले असून जनतेला प्रश्न पडला आहे की नेमके मुत्रीघर कोठे आहे.स्वच्छतेच्या व साफसफाई च्या बाबतीत शहर अग्रेसर दाखवले आहे. परंतु तसे नाही.

नगरपालिकेच्या परिसरामध्ये राबविण्यात आलेल्या स्वच्छ भारत अभियान अंतर्गत राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या काढलेल्या चित्रा समोरच नागरिक अस्वच्छता करताना दिसतात. तर पोस्ट ऑफीस जवळ मुत्रीघराची अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे. शहरात एकच मुत्री घर आहे की काय असा प्रश्न तालुक्यातील नागरिकांना पडला आहे. यावेळी समोरून महिला व शाळेतील विद्यार्थिनी तेथून रस्त्याने ये-जा करत असतात. व अशा दयनीय अवस्था झालेल्या मुत्रीघरामुळे जनता उघड्यावर लघवी करतात. त्यामुळे शाळेतील मुलींना व महिलांना खाली मान टाकून चालावे लागत आहे. ही एक लाजीरवाणी बाब आहे. विशेष म्हणजे या शहराच्या नगराध्यक्षा महिला असून चक्क महिलांसाठी मूत्रीघराची सुविधा



कोणत्याच ठिकाणी नसल्याने भारतातील महिलांना ५० टक्के आरक्षण मिळाल्यावरही तेल्हारा शहरात मात्र महिलांची याबाबतीत कुचंबणा होतांना दिसत असल्यामुळे कसे समजावे महिलांना ५० टक्के आरक्षण जारी केले आहे. तेल्हारा शहरात मात्र महिलांसाठी संडास व मुत्रीघरची व्यवस्था नसल्यामुळे अत्यंत लाजिरवाणी गोष्ट आहे. त्यामुळे शहरात व मुत्रीघर व संडास बांधण्यात यावे अशी महिलांची अशी मागणी आहे.

शहरात गेल्या चार वर्षांमध्ये कुठल्याही प्रकारची फवारणी न झाल्यामुळे मच्छरांचा प्रादुर्भाव वाढला आहे या सर्व प्रकारामुळे घाणीच्या साम्राज्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. तरीसुद्धा पालिकेचे अध्यक्ष पदाधिकारी प्रशासन नेमके कोणत्या कमिशन बाजीच्या केमिकल लोच्या मध्ये गुंतले आहेत. हे समजण्या पलीकडे आहे. नप परिसरामध्ये सर्वत्र घाणीचे साम्राज्य निर्माण झाले असून जागोजागी केरकचरा दिसत आहे.

या संदर्भात नगराध्यक्षांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र त्यांनी या प्रकरणावर कोणतीही प्रतिक्रिया देण्यास टाळाटाळ केली.

एका महिलेने संतप्त प्रतिक्रिया देताना सांगितले, ‘महिला नगराध्यक्ष असतानाही महिलांसाठी सुविधा नाही. नगर परिषदेचे सत्ताधारी ठेक्यांची फिल्डिंग लावण्यात व्यस्त असुन त्यांनी मुलभूत सोयीसुविधेकडे दुर्लक्ष केले आहे. शहराच्या मुख्य मार्केट परिसरात सुसज्ज मुत्री घराची मागणी अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. हा प्रश्न मार्गी लावावा अन्यथा आंदोलक करण्यात येईल असा इशारा प्रा.सचिन थाटे यांनी दिला.

## बोरगावच्या उज्वल पब्लिक स्कूलमध्ये शिवजयंती उत्साहात साजरी

प्रतिनिधी १९ फेब्रुवारी

**बोरगाव:** येथील उज्वल पब्लिक स्कूलमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली. 'जय भवानी, जय शिवाजी'च्या जयघोषाने शाळा परिसर दुमदुमून गेला होता.

कार्यक्रमाला शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. उज्वला नरेंद्र सोनवणे व प्रशासकीय अधिकारी सौ. निता राजेंद्र बोबडे यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आणि दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. शिक्षकांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला अभिवादन करून मानाचा मुजरा केला.

विद्यार्थ्यांनी महाराजांच्या जीवनावर आधारित पोवाडे, स्फूर्तिगीते आणि प्रेरणादायी भाषणे सादर केली. चिमुकल्या विद्यार्थ्यांनी मावळे आणि जिजाऊसाहेबांच्या वेशभूषेत येऊन सर्वांचे लक्ष वेधून घेतले. मुख्याध्यापिका सौ. उज्वला सोनवणे यांनी



विद्यार्थ्यांना शिवरायांच्या आदर्श विचारांचे पालन करण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मीना सराटे, शारदा देशमुख, स्वाती जैन, दिपाली देशमुख, प्रीती वाघमारे, स्मिता पाटील, जया हगवणे, पूजा तळोटकर, रूपाली कडू, अश्विनी माहुलकर, मोहिनी इंगळे, कुमुद काटोले, साक्षी इंगळे, दुर्गा अस्लमोल, प्रशांत होणाळे, रूपाली इंगळे, पूजा भराटे, प्रतीक वानखडे यांनी सहकार्य केले.

## अकोट विधानसभा युवक काँग्रेसची आढावा बैठक

प्रतिनिधी १९ फेब्रुवारी

**अकोट:** अकोट विधानसभा युवक काँग्रेसच्या वतीने यात्रा चौक येथील महेश गणगणे जनसंपर्क कार्यालय येथे आढावा बैठक झाली.या बैठकीत संघटनात्मक बळकटीकरण, आगामी कार्यक्रमांची रूपरेषा तसेच स्थानिक पातळीवरील विविध सामाजिक व राजकीय मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. विशेषतः 'लाडकी बहिणी' योजनेअंतर्गत अनेक पात्र महिलांना अनुदानाची रक्कम वेळेवर मिळत नसल्याबाबत गंभीर चर्चा करण्यात आली. काही



महिलांच्या अर्जांमध्ये तांत्रिक त्रुटी, बँक खात्याची समस्या, कागदपत्रांची पडताळणी प्रलंबित राहणे अशा अडचणी समोर आल्या आहेत. युवक काँग्रेसच्या वतीने या सर्व तक्रारींची यादी तयार करून संबंधित विभागाकडे पाठपुरावा करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच ज्या महिलांना योजनेचा लाभ मिळत नाही, त्यांच्यासाठी मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्याचेही ठरविण्यात आले. सदर बैठक महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी चे प्रदेश महासचिव तथा अकोट विधानसभा पक्षनेता ॲड. महेश गणगणे यांच्या मार्गदर्शनाखाली तर युवक काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष मिलिंद नितोने यांच्या नेतृत्वात बैठक झाली. यावेळी अकोट विधानसभा अध्यक्ष निलेश आग्रे, युवक काँग्रेस अकोट तालुका अध्यक्ष रोशन चिंचोलकर एनएसयूआई चे अभय तेलगोटे, पंकज ठाकरे, केशव हेंड, शंतनू खवले ऋत्विक सोनटक्के, महेश तेलगोटे, संदेश घनबाहादुर ,पंकज आग्रे, अतुल तेलगोटे, रोहित तेलगोटे ,जय तेलगोटे, स्वप्निल तेलगोटे, यश तेलगोटे, लोकेश सपकाळ, पनू तेलगोटे ,वैभव तेलगोटे, रोहित तेलगोटे, आकाश तेलगोटे, निखिल तेलगोटे. यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## निधन वार्ता

### मधुसूदन पसारकर



**अकोला:** रामदासपेठेतील जेष्ठ स्वयंसेवक मधुसूदन उपाख्य मधुकरराव पसारकर यांचे १८ फेब्रुवारीला वृद्धापकाळाने निधन झाले. ते ९६ वर्षाचे होते. अकोला अर्बन बँकेचे संस्थापक सदस्य, भारत शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव, शुक्ल यजुर्वेद संस्थेचे संचालक अशा विविध संस्था संघटनांचे ते कार्यकर्ते होते. त्यांच्या पश्चात पत्नी, प्रशांत, प्रवीण, डॉ. प्रद्युम्न ही मुले आणि मोठा आप्त परिवार आहे.

### अन्नपूर्णा मानकर



**हिवरखेड:** येथील अन्नपूर्णा वासुदेवराव मानकर यांचे १८ रोजी वयाच्या ९८ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्यामागे मोठा आप्त परिवार आहे. त्यांचा अंत्यविधी गाडगेबाबा स्मशानभूमीत पार पडला.

## महाशिवरात्री निमित्त लघुरुद्र यज्ञ; भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती

प्रतिनिधी १९ फेब्रुवारी

**बाळापुर:** शहरातील पवित्र महेश नदीच्या तिरावर विराजमान श्रीक्षेत्र सत्वलिंग चिंचपेड महादेव मंदिरात महाशिवरात्री उत्सवानिमित्त लघुरुद्र यज्ञाचे १२१ दांपत्यांनी पूजन केले. १४ रोजी महापूजेला सुरुवात झाली. रविवारी सकाळी साडेसात वाजता पासून अभिषेक पूजा व १२१ लघुरुद्र यज्ञाचे हवन पूजन झाले. महाआरती झाली.

सोमवारी मंदिरात महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. रात्री बाळापुर शहरातून भोलेनाथाची पालखी शोभायात्रा काढण्यात आली. १२१ लघुत्रज्ञाचे भव्यपूजन करण्याचे हे दुसरे वर्ष होते. यामध्ये पंचक्रोशीतील विविध गावच्या



भक्तांनी सहभाग घेतला व आपली सेवा भोलेनाथ चरणी अर्पण केली. खासदार अनुप धोत्रे दर्शनासाठी आले होते. त्यांच्यासोबत प्रमुख पाहुणे यांनी सुद्धा दर्शन घेतले. आमदार नितीनबापू देशमुख, संदीप पाटील हेही दर्शनासाठी आले होते. दर्शन झाल्यानंतर दोन्ही मान्यवरांचा व प्रमुख पाहुण्यांचा संस्थान महादेव मंदिराच्या वतीने शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी नगर परिषदेचे उपाध्यक्ष सुरेंद्र थोपटे, आरोग्य सभापती बलवीरसिंह ठाकुर, बबलू देशमुख, निलेश हाडोळे, सुभाष धनोकार यांचा मंदिर संस्थानचे अध्यक्ष बबलुभाऊ जडिये यांनी संस्थानच्या वतीने शाल श्रीफळ देऊन सत्कार केला. अरुण भागवत, चंद्रकांत बाकळे, सुभाष अंबाळे, अनिल डंबेलकर, रविंद्र चव्हाण, गजानन वानखडे आदींचा उत्सवात सहभाग होता.

खासदार अनुप धोत्रे यांनी संस्थानला सामाजिक सभागृहासाठी आपल्या निधीमधून बांधून देण्याचे जाहीर केले. आमदार नितीनबापू देशमुख यांनी रस्ता बांधून देण्याचे व संस्थांनला वेळोवेळी सहकार्य करण्याचे जाहीर केले. संपूर्ण परिसर शिवभक्तांनी गजबजून गेला होता. अतिशय आनंददायी वातावरण निर्माण झाले होते. रवींद्र वखरे यांनी महाप्रसादाची व्यवस्था केली होती.

## शेलू वेताळ येथे २२ फेब्रुवारीला शासकीय सेवा व योजनांचा महामेळावा

प्रतिनिधी १९ फेब्रुवारी

**मूर्तिजापूर:** शासनाच्या विविध कल्याणकारी योजना व सेवा सर्वसामान्य नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचत नसल्याची बाब लक्षात घेऊन अकोला जिल्ह्यातील मूर्तिजापूर तालुक्यात शासकीय सेवा व योजनांचा भव्य महामेळावा आयोजित करण्यात आला आहे. रविवार, २२ रोजी सकाळी १० वाजता शेलू वेताळ येथील श्री वेताळ बाबा मंदिर परिसरात हा महामेळावा पार पडणार आहे.

हा उपक्रम राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, मूर्तिजापूर तालुका विधी सेवा समिती व सर्व शासकीय विभाग तसेच अकोला जिल्हा वकील संघ व मूर्तिजापूर वकील संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला आहे.

महामेळाव्यास मुंबई उच्च न्यायालय (नागपूर खंडपीठ) येथील प्रशासकीय न्यायमूर्ती अनिल किलोर, मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती उर्मिला जोशी-फलके (पालक न्यायमूर्ती), मुख्य जिल्हा व सत्र न्यायाधीश शिवाजी कचरे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अकोला जिल्हाधिकारी वर्षा मीना, पोलीस अधिक्षक अर्चित चांडक, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम व ॲड मोतीसिंह मोहता असणार आहेत.

महामेळाव्यात शासनाच्या विविध कल्याणकारी योजना, सेवा, कायदेशीर मदत, विविध दाखले, तक्रार निवारण तसेच नागरिकांना थेट लाभ मिळावा यासाठी विविध शासकीय विभागांचे स्टॉल्स उभारण्यात येणार आहेत. ग्रामीण व शहरी भागातील नागरिकांना योजनांची माहिती आणि प्रत्यक्ष लाभ मिळवून देणे हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे.

उच्च न्यायालयाच्या सूचनेनुसार या महामेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून, अधिकाधिक नागरिकांनी उपस्थित राहून शासकीय योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. यासंदर्भातील माहिती मूर्तिजापूर न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश आसिफ तांबोळी व न्यायाधीश आर. आर. पकडे यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी मूर्तिजापुर वकील संघाचे अध्यक्ष ॲड सुनिल कांबे, उपाध्यक्ष ॲड निलेश सुसतकर, सचिव ॲड शरद मेहरे, कोषाध्यक्ष ॲड सिमरन देविकर यांच्यासह न्यायालयातील विधीज्ञ, महिला विधीज्ञ व कर्मचारी उपस्थीत होते.

## काशी कवळेश्वर महादेव मंदिरात शिवनामाचा अखंड गजर



प्रतिनिधी १९ फेब्रुवारी

**पातुर:** ओम नमः शिवाय शांताय कारणत्रय हेतवे निवेद्ययामी चातमान त्व :गती परमेश्वर या मंत्राचे पालन करत येथील पुरातन श्री काशी कवळेश्वर महादेव मंदिरात १६ फेब्रुवारीला महाशिवरात्री महोत्सवाचे आयोजन काशी कावळेश्वर भजन मंडळ तथा समस्त शिवभक्त मंडळ यांच्या वतीने करण्यात आले होते.

प्रातःकाळीच रुद्राभिषेक महाआरती केल्यानंतर सकाळपासूनच महादेवाचे दर्शन घेण्यासाठी भक्तांनी रांगा लावल्या होत्या. यावेळी भक्तांना शिवरात्री उपवास असल्याने उपवासाचे लाडू, चहा, आणि साबुदाण्याची उसळचा प्रसाद देण्यात आला. तर श्री काशी कवळेश्वर भजन मंडळाच्या वतीने शिवनामाचा गजर अखंड करण्यात आला. शिवाची भजने आणि खंजिरीच्या खणखणाटाने परिसर दुमदुमून गेला.

काशी कवळेश्वर महादेवाचे मंदिर शहरापासून दक्षिणेकडे चिंचखेड शेत शिवारात दुर्गम परिसरात एकांत स्थळी आहे. दर सोमवारी हरिनाम स्मरण, पंचपती आरतीची मुहूर्तमेढ भूविकास बँकेचे व्यवस्थापक स्व. दत्तात्रय गिरोलकर, शामराव गिऱ्हे, प्रल्हाद यादव, नामदेव फुलारी, भानुदास तेजवाल, लक्ष्मण गुजर, बळीराम सातव, रामभाऊ ढगे, मधुकर सुरवाडे, पंजाबराव सुरवाडे, सुरेश कोथळकर, जयवंत पुरुषोत्तम आदींनी रोवली. दर सोमवारी रात्री नैसर्गिक आपत्ती असो. तिन्ही ऋतूमध्ये परंपरा कायम ठेवली. समस्त शिवभक्त मंडळाने महोत्सवात परिश्रम घेतले.

## तांडा सुधार समितीच्या सभेत अपमानास्पद वागणूक देणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाईची मागणी

प्रतिनिधी १९ फेब्रुवारी



**अकोला :** जिल्हा परिषद च्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दालनात झालेल्या तांडा सुधार समिती च्या सभेत उपस्थित पदाधिकारी यांना अपमानास्पद वागणूक देणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई करावी तसेच लेखी स्वरूपात माफी मागावी अन्यथा २६ फेब्रुवारी रोजी जिल्हा परिषद मध्ये आत्मदहन करण्याचा इशारा या वेळी देण्यात आला आहे. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दालनात संत सेवालाल महाराज तांडा सुधार समिती ती ची सभा आयोजन करण्यात आली होती. या सभे मध्ये राज्यपाल नियुक्त जिल्हा तसेच तालुक्याचे सदस्य उपस्थित झाले होते. सदर सदस्य तसेच पदाधिकारी मिटिंग ला बसल्या नंतर काही वेळातच उपस्थित अधिकाऱ्यांनी उपस्थित सदस्यांना बाहेर काढून दिले तसेच बाकी सदस्यांना सांगण्यात आले की जो परेंत पालकमंत्री आदेश देत नाहीत तो परेंत आपली मिटिंग होणार नाही. अशा प्रकारे उपस्थित अधिकाऱ्यांनी संत सेवालाल महाराज तांडा समृद्धी समितीच्या तसेच बंजारा समाजाचा अपमान झाला असून या मध्ये दोषी असलेल्या अधिकाऱ्यांवर तात्काळ कारवाई न झाल्यास येणाऱ्या काही दिवसात तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडणार असल्याचा इशारा या वेळी बंजारा समाजाच्या वतीने दिला आहे.

# अकोटमध्ये अवतरले 'रयतेचे राजे'!

### ◆ ३० हजार स्क्वेअर फुटांच्या रांगोळीतून शिवरायांना मानवंदना

प्रतिनिधी १९ फेब्रुवारी

**अकोला :** सह्याद्रीच्या कड्याकपाऱ्यांत घुमणारा 'जय भवानी, जय शिवाजी'चा जयघोष आज अकोटच्या शिवाजी महाविद्यालयाच्या मैदानावर रंगांच्या रूपाने साकारला आहे. शिवजयंतीचे औचित्य साधून येथील विद्यार्थ्यांनी तब्बल ३० हजार चौरस फुटांची भव्यदिव्य रांगोळी साकारली असून, शिवरायांचे हे देदीप्यमान रूप पाहून अवघे शहर थक्क झाले आहे.

ही केवळ एक कलाकृती नसून १५ विद्यार्थ्यांच्या अहोरात्र कष्टाचे आणि श्रद्धेचे फळ आहे. ३० हजार स्क्वेअर फूट परिसरात पसरलेली ही रांगोळी पाहताना डोळ्यांचे पारणे फिटते. ही भव्य प्रतिमा पूर्ण करण्यासाठी तब्बल ४० क्विंटल (४००० किलो) रंगांचा वापर करण्यात आला आहे. अवघ्या १५ शिलेदारांनी सलग ६ दिवस रक्ताचे पाणी करून, प्रत्येक रेषेत आणि रंगात जिवंतपणा ओतण्यासाठी मेहनत घेतली. प्राचार्य डॉ. सुनील पांडे आणि 'चतुर्भुज आर्ट'चे संचालक अनिल काळे यांच्या कल्पकतेतून हा 'शिव-सोहळा' आकारास आला.

सिंहासनावर विराजमान असलेल्या छत्रपती शिवरायांची ही प्रतिमा इतकी हुबेहूब आहे की, जणू महाराज प्रत्यक्ष दर्शन देत आहेत असा भास होतो. ड्रोन कॅमेऱ्यातून टिपलेली या रांगोळीची छायाचित्रे सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत असून, अकोटच्या या विद्यार्थ्यांचे कौतुक सातासमुद्रापार पोहोचले आहे.'अकोटच्या मातीत कलेचा आणि अस्मितेचा हा अनोखा आविष्कार पाहून ऊर अभिमानाने भरून येतो. सलग तिसऱ्या वर्षी असा विश्वविक्रमी प्रयत्न करून विद्यार्थ्यांनी शिवरायांप्रती असलेली आपली निष्ठा सिद्ध केली आहे.'





### परंपरेचा वारसा आणि विद्यार्थ्यांचे योगदान

गेल्या पाच वर्षांपासून हे महाविद्यालय शिवजयंती आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरी करत आहे. पण यंदाचा हा प्रयोग सर्वांत मोठा आणि प्रभावी ठरला आहे. मैदानाची शास्त्रोक्त आखणी करण्यापासून ते रंगछटांच्या अचूक वापरापर्यंत विद्यार्थ्यांनी दाखवलेले कौशल्य हे व्यावसायिक कलाकारांनाही लाजवणारे आहे. या ऐतिहासिक सोहळ्यामुळे अकोट शहरात सध्या भक्ती आणि शक्तीचे वातावरण निर्माण झाले असून, ही रांगोळी पाहण्यासाठी संपूर्ण जिल्ह्यातून शिवप्रेमींची गर्दी होत आहे.

# सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ

गुरुवार, दि. १९ फेब्रुवारी २०२६ https://epaper.citynewssuperfast.com


# शिवजयंतीनिमित्त चित्रकला स्पर्धा, रक्तदान व बाईक रॅलीने अनोखे अभिवादन





प्रतिनिधी १९ फेब्रुवारी

**यवतमाळ :** छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त शहरात विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि क्रीडा उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समिती यांच्या वतीने 'शिवकालीन' या विषयावर चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. शालेय, महाविद्यालयीन आणि लहान मुलांचा गट अशा तीन विभागांत ही स्पर्धा पार पडली. विद्यार्थ्यांनी शिवरायांचे पराक्रम, किल्ले, स्वराज्य स्थापनेचे प्रसंग प्रभावीपणे रेखाटले. प्रा. गौरव धवस व निलेश तायडे यांनी स्पर्धेचे नियोजन व संयोजन पाहिले.

याच अनुषंगाने रांगोळी स्पर्धाही घेण्यात आली. महिलांनी आकर्षक रंगसंगतीतून शिवचरित्र साकारत अनोख्या पद्धतीने अभिवादन केले. विविध स्पर्धांमुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

दरम्यान, संभाजी ब्रिगेड यांच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. सुमारे ५० रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. रक्तदान करून शिवरायांना अभिवादन करण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

शिवतीर्थ येथे नगराध्यक्ष ॲड. प्रियदर्शनी उईके तसेच आदिवासी विकास मंत्री प्रा. अशोक उईके यांनी भेट देऊन छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण केला. सकाळपासूनच नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहत अभिवादन केले. महिला व युवकांचा सहभाग लक्षणीय होता.

यवतमाळ शहरातून भव्य बाईक रॅली काढण्यात आली. भगवे ध्वज आणि घोषणाबाजीने शहर दणाणून गेले.

तसेच महात्मा ज्योतिबा फुले क्रीडा बहुउद्देशीय संस्था यांच्या वतीने कराटे स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. लहान मुलांनी उत्साहाने सहभाग घेत क्रीडाप्रेमी वृत्तीचे दर्शन घडविले.

विविध उपक्रमांमुळे शिवजयंती उत्सवाला सामाजिक व सांस्कृतिक रंग चढला असून यवतमाळकरांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

# 38 हजार 764 विद्यार्थी देणार दहावीची परीक्षा

## कॉपीमुक्ततेसाठी भरारी पथके, सीसीटीव्हीचा राहणार 'वॉच'

### परीक्षा केंद्रातील वर्गखोल्यात 'सीसीटीव्ही' अनिवार्य

■ प्रत्येक परीक्षा केंद्रातील वर्गखोल्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे बंधनकारक करण्यात आले आहे. जिल्ह्यातील संवेदनशील व उपद्रवी परीक्षा केंद्रांवर विशेष लक्ष ठेवण्यात येत आहे. कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी सर्वतोपरी दक्षता घेतली जात आहे. जिल्हाधिकारी विकास मीना व पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांच्या मार्गदर्शनाखाली परीक्षा काळात पोलीस बंदोबस्त चोख ठेवण्यात आला आहे. परीक्षा शांततेत आणि निर्भय वातावरणात पार पडाव्यात, यासाठी सर्व यंत्रणा सज्ज असल्याची माहिती माध्यमिक शिक्षणाधिकारी किशोर पागोरे व उपशिक्षणाधिकारी योगेश डाफ यांनी दिली.



### सीसीटीव्ही नसलेल्या केंद्रांवर कर्मचाऱ्यांची अदलाबदल

■ अमरावती विभागीय मंडळाने सीसीटीव्ही कॅमेरे उपलब्ध नसलेल्या परीक्षा केंद्रांवर कर्मचाऱ्यांची अदलाबदल करण्याचे निर्देश जारी केले आहेत. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांच्या सचिवांकडून प्राप्त झालेल्या पत्रानुसार, ज्या परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेरे नाहीत, त्या ठिकाणी कर्मचाऱ्यांची अदलाबदल करणे अनिवार्य करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने संबंधित परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेरे आहेत की नाहीत, याची खातरजमा करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. ज्या केंद्रांवर सीसीटीव्ही सुविधा उपलब्ध नाही, त्या ठिकाणी नवे केंद्रसंचालक व अन्य कर्मचारी नियुक्त करून त्याची माहिती विभागीय मंडळास सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसह परीक्षेची पारदर्शकता अबाधित ठेवण्यासाठी राज्य मंडळाने ही पावले उचलली असून, संबंधित शाळा व परीक्षा केंद्रांनी तात्काळ माहिती सादर करावी, असे आदेश विभागीय सचिव प्रिया देशमुख यांनी दिले आहे.

प्रतिनिधी १९ फेब्रुवारी

**यवतमाळ :** जिल्ह्यात महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांच्या वतीने शुक्रवार, २० फेब्रुवारीपासून दहावीच्या परीक्षेला सुरुवात होत आहे. कॉपीमुक्त व पारदर्शक वातावरणात परीक्षा पार पडाव्यात, यासाठी प्रशासनाने व्यापक आणि कडक उपाययोजना केल्या असून परीक्षा केंद्रांवर 'सीसीटीव्ही वॉच'सह भरारी पथकांचा विशेष बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

जिल्ह्यात दहावीची परीक्षा १५६ परीक्षा केंद्रांवर होणार असून, एकूण ३८ हजार ७६४ विद्यार्थी परीक्षेला सामोरे जाणार आहेत. परीक्षेदरम्यान कोणताही गैरप्रकार घडू नये यासाठी शिक्षण विभागाने सहा भरारी पथकांची निर्मिती केली आहे. ही पथके अचानक तपासणी करणार असून, तालुका स्तरावर महसूल व ग्रामविकास विभागाची स्वतंत्र पथके कार्यरत असतील. प्रत्येक परीक्षा केंद्रावर बैठे पथक तैनात करण्यात आले असून, त्यामध्ये तलाठी व ग्रामसेवकांचा समावेश आहे.

# पुसदमध्ये क्रिकेट सट्यावर धाड; लाखोंचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी १९ फेब्रुवारी

**पुसद :** ऑनलाईन क्रिकेट सट्यावर कारवाई करत पुसद शहर पोलिसांच्या डी. बी. पथकाने ८ लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई 'Promotion and Regulation of Online Gaming Act, 2025' अंतर्गत करण्यात आली.

पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार, MIDC परिसरातील आयटीआय कॉलेजजवळ एक व्यक्ती त्याच्या पांढऱ्या रंगाच्या क्रेटा (MH-29-BK-7111) कारमध्ये बसून भारत विरुद्ध नेदरलँड्स टी-२० विश्वचषक सामन्यावर प्रत्येक बॉल, रन व इतर घटनांवर पैशांची ऑनलाईन बाजी स्वीकारत असल्याचे समजले.

यानुसार पुसद शहर पोलीस ठाण्याचे ठाणेदार पोलीस निरीक्षक सेवानंद वानखडे यांच्या मार्गदर्शनाखाली डी. बी. पथकाने सापळा रचून कारवाई केली. कारमध्ये बसून मोबाईलद्वारे ऑनलाईन बेटिंग घेत असताना संशयिताला ताब्यात घेण्यात आले.

अटक करण्यात आलेल्या व्यक्तीचे नाव कैलास लखनलाल साहू (वय ४८, रा. ऋग्वेद कॅम्पस, पुसद) असे आहे. त्याच्याकडून बेटिंगसाठी वापरलेले दोन मोबाईल फोन (अंदाजे किंमत २५ हजार रुपये) तसेच सुमारे ८ लाख रुपये किंमतीची कार असा एकूण ८ लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सदर आरोपीविरुद्ध 'Promotion and Regulation of Online Gaming Act, 2025' च्या कलम ५ तसेच महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्याच्या कलम ४ व ५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कायद्यानुसार तीन वर्षांपर्यंतच्या कारावासाची व एक कोटी रुपयांपर्यंत दंडाची तरतूद आहे. पुढील तपास डी. बी. पथक करत आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात तसेच सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी हर्षवर्धन बी. जे. यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

# हद्दवाढीच्या मागणीला वेग; पुसद नगरपरिषदेत समावेशासाठी ग्रामपंचायतींचा ठराव

प्रतिनिधी १९ फेब्रुवारी

**पुसद :** शहरालगतच्या ग्रामपंचायतींना मूलभूत सुविधांचा अभाव भासत असल्याने पुसद नगरपरिषद हद्दवाढीची मागणी पुन्हा जोर धरू लागली आहे. गेल्या काही वर्षांत शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढली असून नगरपरिषद क्षेत्राच्या लगत असलेल्या चार ते पाच ग्रामपंचायतींवरही तितकाच लोकसंख्येचा ताण पडत आहे. मात्र अल्प अर्थसंकल्प व मर्यादित साधनसामग्रीमुळे या भागांचा अपेक्षित विकास झालेला नाही. परिणामी रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता व आरोग्यसेवा यांसारख्या मूलभूत सुविधांपासून अनेक परिसर वंचित आहेत.

गायमुख ग्रामपंचायतीने आपल्या सर्वांगीण विकासासाठी पुसद नगरपरिषदेत समावेशाचा ठराव मासिक सभेत सर्वानुमते मंजूर केला. सुभाष खिल्लारे यांनी मांडलेल्या प्रस्तावाला विनोद चव्हाण यांनी अनुमोदन दिले. सरपंच सुनिता गायकवाड, उपसरपंच मोबीन अहमद मजीद खान व सदस्य उपस्थित होते.

शहरालगत श्रीरामपूर, धनकेश्वर, काकडदाती, बोरगडी आणि गायमुखनगर या ग्रामपंचायतींची एकत्रित लोकसंख्या ५० हजारांहून अधिक असल्याचे सांगितले जाते. वाढती वस्ती आणि अपुरी पायाभूत सुविधा यामुळे नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. काही वर्षांपूर्वी यवतमाळ नगरपरिषदेला लागून असलेल्या सहा ग्रामपंचायतींचा समावेश नगरपरिषद क्षेत्रात करण्यात आला होता. त्यानंतर त्या भागाच्या विकासाला गती मिळाल्याचे उदाहरण समोर आहे.

गायमुख नगर ग्रामपंचायत क्षेत्राच्या हद्दवाढीची मागणी मागील दहा वर्षांपासून सातत्याने होत आहे. माजी ग्रामपंचायत सदस्य गणेश राठोड यांनी सांगितले की, यापूर्वीही ग्रामसभा व मासिक सभेत ठराव घेऊन मंत्रालय स्तरावर पाठपुरावा करण्यात आला; मात्र अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही. आता नव्याने ठराव सादर करण्यात आला असून नगरपरिषद प्रशासनाने हद्दवाढ समिती स्थापन करून प्रस्ताव ग्रामविकास व नगरविकास मंत्रालयाकडे पाठवावा, अशी मागणी होत आहे.

# राज्य सल्लागार समितीवर प्रा.डॉ.अनिल काळबांडे

प्रतिनिधी १९ फेब्रुवारी

**उमरखेड :** साहित्य सांस्कृतिक अकादमी, पुणे व दि इंटरनॅशनल लिटरेचर अँड कल्चर अकॅडमी, दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे येथे झालेल्या सर्वसाधारण सभेत महाराष्ट्रातील ज्येष्ठ साहित्यिक तथा पत्रकार प्रा. डॉ. अनिल काळबांडे यांची राज्य सल्लागार समितीवर नियुक्ती करण्यात आली. राज्य समन्वयक



प्रतीक्षा पाटील यांनी त्यांच्या निवडीची अधिकृत घोषणा केली.

साहित्य, पत्रकारिता आणि सामाजिक प्रबोधन क्षेत्रातील त्यांच्या भरीव कार्याची दखल घेऊन ही नियुक्ती करण्यात आल्याचे सांगण्यात आले. राज्यातील साहित्यिक उपक्रमांना दिशा देणे, जिल्हा व तालुका स्तरावर साहित्य संमेलनांचे नियोजन करणे, नवोदित लेखक व कवींना प्रोत्साहन देणे तसेच मराठी साहित्याची ओळख राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर दृढ करणे, या जबाबदाऱ्या त्यांच्यावर सोपविण्यात येणार आहेत. त्यांच्या नियुक्तीचे सर्वत्र स्वागत होत आहे.

# आर्णी येथे संत रविदास जयंतीनिमित्त शोभायात्रा

प्रतिनिधी १९ फेब्रुवारी

**आर्णी :** आर्णी येथील गुरु रविदास बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने संत रविदास यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. संत रविदास नगर येथून काढण्यात आलेल्या भव्य शोभायात्रेमुळे परिसर भक्तिमय वातावरणाने न्हाऊन निघाला.

शोभायात्रेनंतर रेणुका मंगल कार्यालय येथे मुख्य कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुधाकर उद्धव वाडेकर होते. सत्कारमूर्ती म्हणून नवनिर्वाचित नगराध्यक्ष नालंदाजी भरणे,



उपनगराध्यक्ष निलेशभाऊ गावंडे तसेच यवतमाळ नगर परिषदेच्या नवनिर्वाचित नगरसेविका सौ. स्वाती अभिलाष खंडारे उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे उद्घाटन आर्णीचे ठाणेदार निलेश सुरटकर यांच्या हस्ते झाले.

प्रमुख पाहुणे म्हणून सुरेश खंडारे, हरीभाऊ खंडारे, देवानंद पांढरे उपस्थित होते. प्रमुख वक्ते गजानन घुबडे यांनी संत रविदास महाराजांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत समता, बंधुता आणि सामाजिक न्यायाचा संदेश अधोरेखित केला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीकांत वानखडे यांनी केले. यावेळी 'दलित मित्र' लक्ष्मणराव कोरटकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ रमेश कोरटकर यांच्या हस्ते चिमुकल्यांच्या वक्तृत्व स्पर्धेतील गुणवंतांना बक्षिसे प्रदान करण्यात आली. कार्यक्रमाचे संचालन सौ. दीक्षा गोडवे यांनी तर आभार प्रदर्शन अनिल खंडारे यांनी केले.

गुरु रविदास महिला आघाडीच्या अध्यक्षा लिलाबाई वानरे, गुरु रविदास युवा मंच अध्यक्ष रोहित पाटील यांच्यासह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विविध कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. जयंती उत्सवातून सामाजिक एकात्मतेचा संदेश देत संतांच्या विचारांचे स्मरण करण्यात आले.

# आर्णी क्रिकेट प्रीमियर लीगचा जल्लोषात शुभारंभ

## 'ऑपरेशन प्रस्थान'मधून पोलीस-जनतेचा स्नेहबंध अधिक दृढ

प्रतिनिधी १९ फेब्रुवारी

**आर्णी :** युवकांना विधायक दिशादर्शन देत क्रीडामाध्यमातून समाजात सकारात्मक ऊर्जा निर्माण करण्याच्या उद्देशाने आर्णी पोलीस स्टेशनच्या वतीने 'ऑपरेशन प्रस्थान' अंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या APL आर्णी क्रिकेट प्रीमियर लीग स्पर्धेचा उत्साहात शुभारंभ झाला. लोकप्रिय आमदार राजूभाऊ तोडसाम यांच्या हस्ते उद्घाटन सोहळा पार पडला.

उद्घाटनप्रसंगी आर्णीचे ठाणेदार निलेश सुरडकर यांच्यासह पोलीस



विभागातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मैदानावर खेळाडू आणि क्रीडाप्रेमींची लक्षणीय उपस्थिती दिसून आली. जल्लोषात झालेल्या उद्घाटनामुळे संपूर्ण परिसरात क्रीडामय वातावरण निर्माण झाले. आमदार तोडसाम यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, क्रीडा क्षेत्र युवकांमध्ये शिस्त, संघभावना आणि नेतृत्वगुण विकसित करण्यास हातभार लावते. स्पर्धात्मक वातावरणातून सकारात्मक ऊर्जा निर्माण होत असून युवकांना विधायक कार्यासाठी प्रेरणा मिळते. समाज आणि पोलीस प्रशासन यांच्यातील विश्वास अधिक दृढ करण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले. 'ऑपरेशन प्रस्थान' अंतर्गत आयोजित ही लीग केवळ क्रिकेटपुरती मर्यादित नसून सामाजिक सलोखा आणि परस्पर विश्वास वाढविण्याचा प्रयत्न असल्याची भावना उपस्थितांकडून व्यक्त झाली.

या उपक्रमामुळे आर्णी परिसरातील युवकांमध्ये नवचैतन्य संचारले असून आगामी सामने रंगतदार होणार, अशी उत्सुकता क्रीडाप्रेमींमध्ये व्यक्त होत आहे.

# अहमदाबाद येथे गोदावरी अर्बनची १०० वी शाखा सुरू

## सहकारातून समृद्धीकडे प्रवास – केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ

प्रतिनिधी १९ फेब्रुवारी

**यवतमाळ :** सहकार क्षेत्रातील विश्वासाचे प्रतीक ठरलेल्या गोदावरी अर्बनने विस्ताराच्या वाटचालीत ऐतिहासिक टप्पा गाठत गुजरातची राजधानी अहमदाबाद येथे आपल्या शंभराव्या शाखेचे भव्य उद्घाटन केले. या शाखेचे उद्घाटन केंद्रीय सहकार व नागरी हवाई वाहतूक मंत्री मा. मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले. संस्थेच्या प्रगतीच्या प्रवासातील हा अभिमानास्पद क्षण मानला जात आहे. या सोहळ्यास माजी राज्यसभा खासदार मा. जुगलजी ठाकूर, बॉम्बे स्टॉक एक्सचेंजचे माजी अध्यक्ष दिना मेहता, गुजरात स्टेट को-ऑपरेटिव्ह बँकेचे अध्यक्ष मा. अजयजी पटेल, चेंबर ऑफ कॉमर्सचे सचिव मा. सुधांशूजी मेहता, गुजरात को-ऑप सोसायटीज फेडरेशनचे अध्यक्ष मा. घनश्यामजी अमिन तसेच भारत सरकार नियामक मंडळाचे सदस्य व राष्ट्रीय मत्स्य व्यवसाय विकास मंडळाचे डॉ. मनोज शर्मा यांची प्रमुख उपस्थिती लाभली. उद्घाटनप्रसंगी मंत्री मुरलीधर मोहोळ म्हणाले की, "गोदावरी अर्बनची १०० वी शाखा गुजरातमध्ये सुरू होत असल्याचा मला विशेष आनंद आहे. देशात सहकार क्षेत्राचा विस्तार करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी मोठा पुढाकार घेतला आहे. गोदावरी अर्बनने अल्पावधीत उल्लेखनीय प्रगती साधली असून ग्रामीण व शहरी भागातील नागरिकांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी संस्थेचे कार्य प्रेरणादायी आहे. सहकारातून समृद्धीकडे हा प्रवास देशासाठी महत्त्वाचा आहे." यावेळी जुगल ठाकूर म्हणाले की, "हेमंत पाटील यांच्यासोबत लोकसभेत काम करताना त्यांच्या अभ्यासू वृत्तीची ओळख झाली होती. मात्र सहकार क्षेत्रात त्यांनी उभारलेले मोठे कार्य आज प्रत्यक्ष अनुभवता आले. गोदावरी अर्बनने समाजात विश्वास निर्माण केला आहे." दिना मेहता यांनी सांगितले की, "भारत आर्थिक महासत्ता होण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. मात्र दरडोई उत्पन्न वाढविण्यासाठी वित्तीय समावेशन आवश्यक आहे. या दृष्टीने गोदावरी अर्बन उल्लेखनीय कार्य करत आहे." संस्थेच्या अध्यक्षा राजश्री पाटील यांनी सांगितले की, "गुजरातने सहकार क्षेत्राला नवे बळ दिले आहे. विकसित शहर म्हणून अहमदाबादकडे देशाचे लक्ष आहे. त्यामुळेच येथे शाखा सुरू करण्याचा निर्णय घेतला. ग्राहकांच्या विश्वासामुळेच संस्थेचा हा यशस्वी प्रवास शक्य झाला असून सहकार क्षेत्रातील विश्वास अधिक दृढ करण्यासाठी आम्ही सातत्याने कार्यरत राहू." डॉ. मनोज शर्मा म्हणाले की, "एका शाखेपासून सुरू झालेली ही संस्था आज शंभर शाखांपर्यंत पोहोचली आहे. आर्थिक व्यवहार आणि



बँकिंग व्यवस्था देशाच्या प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाची आहे." कार्यक्रमाच्या प्रस्ताविकात व्यवस्थापकीय संचालक धनंजय तांबेकर यांनी सांगितले की, "अहमदाबाद येथे १०० वी शाखा सुरू होत असल्याचा आम्हाला अभिमान आहे. ग्राहकांसाठी अत्याधुनिक सेवा व सुविधा उपलब्ध करून देत ही शाखा कार्यान्वित करण्यात आली आहे." या उद्घाटनामुळे संस्थेच्या प्रगतीच्या वाटचालीत नवा अध्याय सुरू झाला असून सहकार क्षेत्रातील सेवा अधिक व्यापक करण्यासाठी हा टप्पा प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला. यावेळी संस्थेचे संस्थापक नामदार हेमंत पाटील, व्यवस्थापकीय संचालक धनंजय तांबेकर, संचालक वर्षा देशमुख, साहेबराव मामिलवाड, अजय देशमुख सरसमकर, स्थानिक सल्लागार समितीचे अध्यक्ष विशाल दवे, मेरुभाई अलगोतर, हार्दिक नगर, रोहन हिराणी, भीस्म शाह, अनुज शहा, अंकुर शहा, उपसरव्यवस्थापक रवि इंगळे, उपसरव्यवस्थापक विजय शिरमेवार, वरिष्ठ व्यवस्थापक महेश केंद्रे, अहमदाबाद शाखा व्यवस्थापक अंकुश बिबेकर, आयटी व्यवस्थापक पवन यादव, वाणिज्य व्यवस्थापक प्रशांत कदम यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# ट्रकने कार ४०० मीटर नेली फरफटत, तिघे गंभीर

प्रतिनिधी १९ फेब्रुवारी

**उमरखेड :** नागपूर–तुळजापूर राष्ट्रीय महामार्गावरील उमरखेड–महागाव मार्गावर दि. १७ फेब्रुवारी रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास ट्रक व कार यांच्यात भीषण अपघात झाला. ट्रक चालकाने धडक दिल्यानंतर कार सुमारे ४०० मीटरपर्यंत फरफटत नेल्याने करंजखेड येथील तिघेजण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींवर नांदेड येथे उपचार सुरू आहेत.

फिर्यादी संदीप रामदास ठाकरे (रा. करंजखेड, ता. महागाव) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांचा चुलत भाऊ गजानन किसन ठाकरे कुटुंबासह करंजखेड येथे वास्तव्यास आहे. त्यांच्या कुटुंबातील रेनॉल्ट क्विड (क्र. MH 29 AR 5404) ही चारचाकी गाडी नांदेडहून करंजखेडकडे येत होती. दरम्यान, चिल्ली गावासमोरील चढावर समोरून जाणारा ट्रक (क्र. MH 34 M 8577) भरलेला असल्याने नागमोडी पद्धतीने जात होता. ट्रक चालकाच्या निष्काळजी वाहनचालनामुळे कारची ट्रकला धडक बसली. धडकेनंतर कार ट्रकला अडकली असताना चालकाने वाहन न थांबविता सुमारे ४०० मीटरपर्यंत कार ओढत नेल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. या अपघातात गजानन किसन ठाकरे, चालक आकाश रामराव फाळके आणि लक्ष्मीकांत गजानन ठाकरे हे गंभीर जखमी झाले. घटनास्थळी उपस्थित नागरिकांनी जखमींना तत्काळ उमरखेड येथील खासगी रुग्णालयात हलविले. प्राथमिक उपचारानंतर त्यांना नांदेड येथील यशोसाई हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले असून तिघांवर उपचार सुरू आहेत. अपघातात कारचे सुमारे दीड लाख रुपयांचे नुकसान झाल्याचे सांगण्यात आले. या प्रकरणी उमरखेड पोलीस ठाण्यात ट्रक चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची मागणी केली.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

गुरूवार दि.१९ फेब्रुवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# शिवरायांना 'मुजरा'!



# जिल्ह्यात 'जय शिवराया'चा गजर..!

## *सार्वजनिक शिवजयंती महोत्सव * रक्तदान शिबिर, सद्भावना रॅलीसह ठिकठिकाणी विविध उपक्रम






●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

सार्वजनिक शिवजयंती महोत्सवाला सकाळीच छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला जलअभिषेक करून दिपोत्सव राबवून ध्वजारोहन करून सुरूवात करण्यात आली. यावेळी नगराध्यक्ष अनिल केंदळे , समाजसेवक प्रा. दिलीप जोशी, सागर गोरे, राजु वानखेडे, गणेश सुर्वे, काळबांडे यासह अनेक जण उपस्थित होते.

शहरात थाटात प्रारंभ झाला असून शिवजयंतीनिमित्त जिल्ह्यात रक्तदान शिबिरासह विविध उपक्रम राबविण्यात येणार आहे. शिवजयंतीनिमित्त शिवभक्तांनी शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला अभिवादन केले. सार्वजनिक शिवजयंती उत्सव व मराठा सेवा संघाच्या वतीने शहरात सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती गठण करून विविध उपक्रम राबवून शिवजयंती साजरी करण्याची परंपरा कायम ठेवली आहे. छत्रपती शिवरायांच्या जयंतीनिमित्त सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीच्या वतीने वाशिम शहरातून भव्य मोटार सायकल रॅली काढण्यात आली. रक्तदान शिबिर स्पर्धकांना बक्षीस वितरण तसेच व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. कुळवाडी भूषण बहुजन प्रतिपालक छत्रपती शिवरायांचे जयंती १९ फेब्रुवारी रोजी मोठ्या उल्हासात प्रतिवर्षी साजरी करण्यात येते. त्याचप्रमाणे यावर्षी सुद्धा शिवजयंती सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. आज गुरूवार दि. १९ फेब्रुवारी रोजी सकाळी साडेदहा वाजता श्री शिवाजी हायस्कूल येथून मोटर सायकल सद्भावना राहिलेला जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर व वाशिम जिल्हा पोलीस अधीक्षक अनुज तारे, मुख्यकार्यकारी अधिकारी अर्पित चव्हाण, हे हिरवी झेंडी दाखविली. शहरातील प्रमुख मार्गावरून रॅली काढण्यात आली. यावेळी नगराध्यक्ष अनिल केंदळे, निवासी जिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, न.प. मुख्यअधिकारी निलेश गायकवाड, तहसीलदार निलेश पळसकर , जिल्हा शल्यचिकीत्सक डॉ. अनिल कावरखे, नारायणराव काळबांडे, गणेश सुर्वे हे उपस्थित होते. प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला जलाभिषेक व सर्व सामाजिक संघटनाच्या वतीने अभिवादन करण्यात आले.

सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीचे अध्यक्ष पुरण बदलाणी, सचिव गजानन भोयर यांच्यासह जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी अधिकारी उपस्थित होते. उत्सव समितीच्या वतीने परिश्रम घेण्यात आले.



## थोडक्यात

### भगवंताचे नामस्मरण केल्याने पाप धुऊन निघतात-ह भ प जगन्नाथ महाराज देशमुख



●सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर●

मंगरूळपीर तालुका प्रतिनिधी भगवंताचे नामस्मरण घेण्यास मनुष्याला वेळ काढावा लागतो भगवंताचे नामस्मरण कधीही घ्या त्याला वेळेचे बंधन नसते आपण भगवंतांचे नामस्मरण कोठेही घेऊ शकतो नामस्मरना मध्ये मोठी शक्ती असून मनुष्याने केलेले पाप धुऊन निघतात असे ह भ प जगन्नाथ महाराज देशमुख यांनी शिवनी दलेलपूर येथील श्री संत जयाजी महाराज यात्रा उत्सव दरम्यान आयोजित केलेल्या कीर्तन रुपी सोहळ्या प्रसंगी म्हटले आहे

पुढे त्यांनी म्हटले की भगवंत या जगात जन्माला येतो तो धर्माचे रक्षण करण्यासाठी आणि अधर्मी लोकांचा नाश करण्यासाठी व धर्माला वाचविण्यासाठी भगवंत जन्माला येतो आपल्या महाराष्ट्रामध्ये वारकरी संप्रदायाची खान आहे वारकरी संप्रदाय हा आहे म्हणून धर्म टिकून आहे वारकरी संप्रदाय हा सत्याच्या मार्गाने चालतो तो कधीही असत्या च्या मार्गाचा अवलंब करीत नाही जो साधू संत सत्याच्या मार्गाने चालतो त्यांच्या चरणी नत मस्तक ठेवावे ज्या व्यक्तीचा पाय घसरलेला असतो त्या व्यक्तीच्या मार्गाने मनुष्याने जाऊ नये चांगले विचार माणसांनी आत्मसात केले पाहिजे मानवी जन्मामध्ये मनुष्याने महिलांचा सन्मान केला पाहिजे हीच भारतीयांची संस्कृती आहे भगवंताचे चरण आणि संत महात्म्याची चरण हे सारखेच असतात ज्या घरामध्ये देवाची भक्ती करत असताना जर घरासमोर संत आला असेल तर घरातील भक्ती सोडून संत महात्म्याची पूजन केले पाहिजे हीच खरी भक्ती आहे संताचा अपमान कधीही करू नये संताचा अपमान देवाला सहन होत नाही आजचा धावपळीच्या जीवनामध्ये माणूस संपत्ती कमवायच्या मागे लागलेला आहे परंतु माणसाने संपत्ती कमावली पाहिजे परंतु कोणाचा टळटळात लागला नाही पाहिजे अशा पद्धतीने संपत्ती कमवली पाहिजे संपत्ती बरोबर माणसाने विठ्ठल नामाची संपत्ती कमावली पाहिजे ही संपत्ती माणसाला मोक्ष प्राप्त करून देते असे ह भ प जगन्नाथ महाराज देशमुख यांनी शिवनी दलेलपूर येथील भावीक भक्त मंडळींना कीर्तन रुपी सोहळ्यामध्ये सांगितले आहे.

### समाज कल्याणचा समता डिजीटल चित्ररथ




●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या विविध महत्वपूर्ण योजनांची माहिती संबंधित घटकातील लाभार्थ्यांना व्हावी, यासाठी जिल्हा माहिती कार्यालयाने अनुसूचित जाती उपयोजना सन २०२५-२६ अंतर्गत तयार केलेल्या समता चित्ररथ व डिजीटल एलईडी व्हॅनचा शुभारंभ अपर जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील आणि निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे यांनी आज दि. (१८) रोजी प्रशासकीय इमारत परिसरात चित्ररथाला हिरवी झेंडी दाखवून केला. यावेळी जिल्हा माहिती अधिकारी श्वेता राऊत, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शाहू भगत,सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी संजय राठोड, समाज कल्याण कार्यालयाचे विशेष अधिकारी राहुल चोंडकर आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती.

समता चित्ररथ व डिजीटल एलईडी व्हॅन जिल्हयातील शहरी व ग्रामीण भागातील अनेक गावात जाणार असल्यामुळे संबंधित घटकांच्या लाभार्थ्यांना समाज कल्याण विभागाच्या विविध योजनांची माहिती मिळण्यास मदत होणार आहे. यावेळी जिल्हा माहिती कार्यालयातील राजू जाधव, प्रमोद राठोड, अनिल कुरकुटे उपस्थित होते.

## वाशीम रेल्वे स्टेशनवरील पार्कींगमध्ये...

# लूटण्याची सुविधा, मॅनेज निविदा !

## दादागिरीची ठेकेदारी, अधिकाऱ्यांची भागिदारी...

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

**वाशीम रेल्वे स्टेशनच्या आवारात असलेल्या पार्कींगचा ठेका मागील अनेक वर्षापासून एकाच ठेकेदाराला रेल्वे प्रशासन देत असल्याचा धक्कादायक प्रकार निदर्शनास आला आहे. पार्कींगचा ठेकेदार हा वादग्रस्त असून त्याच्या पार्कींग करण्याच्या दादागिरीने वाशीम परिसरातील सर्व वाहनचालक परेशान झाल्याचे समजते. ठेकेदाराच्या दादागिरीला रेल्वेचे अधिकारी आणि रेल्वे पोलीसांचे आर्थिक पाठबळ असल्यामुळेच त्या ठेकेदाराकडून दररोज रेल्वे स्टेशनवर ये-जा करणाऱ्या वाहन चालकांची खुलेआम आर्थिक लूट सुरू असल्याचे वास्तव आहे. त्या वादग्रस्त ठेकेदाराचा पार्कींगचा ठेका कायमस्वरूपी बंद करण्यासाठी विविध सामाजिक संघटना व ग्राहक संघटनांनी पुढाकार घेतला असल्याचे समजते.**




*पार्कींगच्या टेंडरमध्ये अधिकाऱ्यांची भागिदारी ?

*अधिकारी, रेल्वे पोलीस आणि ठेकेदाराच्या संगनमताने वाहनचालकांची लूट

*अनेक वर्षापासून एकाच ठेकेदाराला पार्कींगचा ठेका

* ये-जा करणाऱ्या सर्व वाहन मालकांना पार्कींग करण्यासाठी दादागिरी

वाशीम रेल्वे स्टेशनच्या आवारात मागील काही वर्षापासून दुचाकी,तिनचाकी आणि चारचाकी वाहनांसाठी पार्कींगची सुविधा रेल्वे प्रशासनाने सुरू केली आहे. रेल्वे प्रशासनाने व अनेक वर्षापासून पार्कींगचा ठेका घेणाऱ्या वादग्रस्त ठेकेदाराने वाहनांच्या सुरक्षिततेसाठी टिनशेडची सुविधा सुद्धा उपलब्ध करुन दिली नाही. पार्कींगसाठी शेड नसल्यामुळे वाहन चालकांची दररोज पार्कींगमध्ये ठेवलेली वाहने उन्ह,वारा,पावसाचा त्रास सहन करत असल्याचे चित्र आहे. रेल्वेस्टेशन वर येणाऱ्या रेल्वे गाडीच्या वेळेवर अथवा वेळेच्या अगोदर प्रवाशांना, नातेवाईकांना आणून सोडण्यासाठी अथवा घेण्यासाठी येणाऱ्या आप्तेष्टांना सुद्धा जबरीने,दादागिरी करून पार्कींगचा वादग्रस्त ठेकेदार वाहने पार्कींगमध्येच लावण्याची सक्ती करून वाहनचालक,मालकांची आर्थिक लूट करत आहे. रेल्वे प्रशासनाच्या अधिकाऱ्यांसमोर व स्टेशनवर ड्युटीवर असलेल्या पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या संगनमतानेच वादग्रस्त ठेकेदाराची अरेरावी व दादागिरी खुलेआम सुरू असल्याची माहिती सूत्रांकडून प्राप्त झाली आहे. रेल्वे पार्कींगचा ठेकेदार असलेल्या ठाकूरची गुन्हेगारीची पार्श्वभूमी असल्याची चर्चा आहे. पार्कींगचा ठेका घेण्याअगोदर ठाकूर ने रेल्वे आवाराच्या गेटला लागून असलेल्या एका गरीब व्यक्तीच्या जागेवर अतिक्रमण केले होते. त्या गरीब माणसाची जागा सोडण्यासाठी ठाकूरने दादागिरी करून त्या गरीब माणसाला खूप त्रास दिला होता.



ठाकूरच्या जाचाला कंटाळून त्या गरीब माणसाला त्याच्या मालकीची आणि व्यवसायासाठी उपयोगी असलेली जागा कमी भावाने विकावी लागल्याची चर्चा आहे. रेल्वे स्टेशनच्या आवारात होणाऱ्या गुन्हेगारीच्या प्रकारात सहभागी असलेल्या आरोपींना सुद्धा वादग्रस्त ठेकेदाराची साथ असल्याचीही स्टेशन परिसरात चर्चा आहे. वाशीम शहर पोलीस ठाण्यात पार्कींगच्या वादग्रस्त ठेकेदाराच्या विरोधात गुन्हा दाखल झाल्याचे समजते. वाशीम शहर पोलीसांनी वादग्रस्त ठेकेदाराची कसून चौकशी केल्यास अनेक गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

त्या वादग्रस्त ठेकेदाराचा पार्कींगचा ठेका कायमस्वरूपी बंद करावा. यापुढील पार्कींगचा ठेका देण्यापुर्वी रेल्वे प्रशासनाने पारदर्शक प्रक्रिया राबवावी, वाशीम जिल्ह्यात जास्त खप असलेल्या मराठी वृत्तपत्रात पार्कींगच्या ठेक्याची जाहिरात प्रकाशीत करावी तसेच पार्कींगसाठी टिनशेड उपलब्ध करून देण्याची मागणीही विविध सामाजिक संघटना आणि ग्राहक संघटनेने रेल्वे प्रशासनाकडे निवेदनाद्वारे मागणी करण्यासाठी पुढाकार घेतल्याचे समजते.


शनिवार दि.१४ फेब्रुवारी २०२६ सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
वाशीम रेल्वे स्टेशनवरील पार्कींगवाल्यांची...
दादागिरीची ठेकेदारी, अधिकाऱ्यांची भागिदारी!

सिटी न्यूज सुपरफास्ट
शुक्रवार १३ फेब्रुवारी २०२६
माणुसकीला रोजच हरताळ...
रेल्वे पार्कींग वाल्याची पोलीसांनाही शिवीगाळ!
अरेरावीची ठेकेदारी, म्हने कायद्यापेक्षाही भारी

वाशीम रेल्वे स्टेशनवरील पार्कींगवाल्यांची...
दादागिरी रोजच पुन्हा-पुन्हा, पोलिसांनीच दाखल केला गुन्हा!
काहीच कारण नसतांना, सिसीटीव्ही कॅमेरे असतांना, पार्कींगचे पैसे देवूनही त्रास विनाकारण

वाशीम रेल्वे स्टेशनवरील पार्कींगवाल्यांची...
दादागिरीची हद्द, ठेका करा रद्द!
रेल्वे समितीचे सदस्य जुगलकिशोर कोठारी व सुरज चौधरी यांनी केली खुद्द

वाशीम रेल्वे स्टेशनवरील पार्कींगवाल्या...
ठेकेदाराची लूट, अधिकाऱ्यांची सूट!
दादागिरीचा तिढा, ठेका रद्द करण्यासाठी उभारणार लढा

### सिटी न्युज सुपरफास्टचा सततचा पाठपुरावा...

७ ते ८ वर्षापासून कारण नसतांना पार्कींगचे पैसे देवूनही विनाकारण महिलांसमोर अश्लिल शिवीगाळ करून दादागिरी करणाऱ्या मग्रुर ठेकेदाराला वाशीमचे नागरिक त्रस्त झाले होते. या संबंधिचे सर्वप्रथम सिटी न्युज सुपरफास्टने व आरआरसी न्युजने वृत्त प्रकाशित करून जनतेच्या भावनेला वाचा फोडली. त्यामुळे तीन दिवसापासून दररोज हजारो फोन सिटी न्युज सुपरफास्टला येत असून धन्यवाद देत आहेत. त्यामुळे जनतेच्या न्यायासाठी जनतेसोबत सिटी न्युज सुपरफास्ट कायम सोबत आहे आणि सोबत राहणार आहे.

# कारवाईसाठी मात्र, अवैध सावकारावर धाडसत्र !

## वाशिम तालुक्यातील तीन ठिकाणी सहकार व पोलिस विभागाची संयुक्त कारवाई

●सिटी न्युज ब्युरो @ कारंजा●

सहकार विभाग यांच्याकडे प्राप्त झालेल्या वाशिम तालुक्यातील अवैध सावकारी व्यवहारासंबंधीच्या तक्रारीच्या अनुषंगाने महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलम १६ अंतर्गत झडतीची कार्यवाही करण्यात आली.



या कारवाईत गैरअर्जदार अनिल मुरलीधर मोरे यांचे चिखली घुले येथील निवासस्थान व सावरगाव बर्ड येथील फार्म हाऊस तसेच साहेबजी नारंग, जवाहर कॉलनी, जुनी आय. यु. डी. पी., वाशिम येथील निवासस्थानी सहकार विभाग व पोलिस विभागाच्या पथकाद्वारे दि. १८ फेब्रुवारी २०२६ रोजी झडती घेण्यात आली. झडती कार्यवाहीदरम्यान पुढील चौकशीसाठी काही महत्त्वाचे दस्तऐवज ताब्यात घेण्यात आले असून सदर प्रकरणी सावकारी कायद्यान्वये पुढील तपास सुरू आहे.ही संपूर्ण कार्यवाही जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, पोलिस अधीक्षक अनुज तारे तसेच अमरावती विभागीय सहनिबंधक गौतम वर्धन यांच्या मार्गदर्शनाखाली व जिल्हा उपनिबंधक गितेशचंद्र साबळे यांच्या नियंत्रणाखाली पार पडली. सदर कार्यवाहीमध्ये सहायक निबंधक (प्रशासन), अधिन जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, वाशिम आर. आर. सावंत, सहायक निबंधक, सहकारी संस्था, मालेगाव आर. व्ही. आकुलवार, सहायक निबंधक, सहकारी संस्था, वाशिम एम. डी. कच्छवे यांच्यासह सहकार विभाग, पोलिस विभाग व कृषी विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

दरम्यान, वाशिम जिल्ह्यातील सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, अवैध सावकारी व्यवहार करणाऱ्यांवर प्रभावी नियंत्रण व कार्यवाही करण्यासाठी त्यांनी सहकार विभागाचे जिल्हा निबंधक (सावकारी) तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, वाशिम तसेच प्रत्येक तालुक्यातील सहायक निबंधक, सहकारी संस्था कार्यालयाकडे गोपनीय स्वरूपात तक्रारी दाखल कराव्यात. तक्रारदाराचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल. असे आवाहन सहायक निबंधक (प्रशासन) अंतर्गत सहकारी संस्थेचे जिल्हा उपनिबंधक आर. आर. सावंत यांनी केले आहे.

## भूमी अभिलेख कर्मचाऱ्यांचे

# असहकार आंदोलन !

●सिटी न्युज ब्युरो @ कारंजा●

भूमी अभिलेख कर्मचारी कृती समिती (महाराष्ट्र राज्य) यांच्या हाकेला प्रतिसाद देत कारंजा येथील भूमी अभिलेख कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी असहकार आंदोलनास सुरुवात केली आहे.आपल्या विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी कर्मचाऱ्यांनी टप्प्याटप्प्याने आंदोलन छेडले आहे.दि.१७ फेब्रुवारी २०२६ रोजी कारंजा भूमी अभिलेख कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी तहसीलदार यांना निवेदन सादर करून आपल्या मागण्यांची माहिती दिली.

यावेळी कर्मचाऱ्यांनी काळ्या फिती लावून कार्यालयीन कामकाज करत शासनाच्या धोरणाचा निषेध व्यक्त केला.तसेच मोजणी साहित्य कार्यालयात जमा करून मोजणीचे काम बंद ठेवण्यात आले.समितीच्या



नियोजनानुसार दि.२३ ते २७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत सामूहिक अर्जित रजा घेऊन असहकार आंदोलन करण्यात येणार आहे.दि.२७ फेब्रुवारी रोजी पुणे येथील जमाबंदी आयुक्त व संचालक,भूमी अभिलेख (महाराष्ट्र राज्य)कार्यालयावर आक्रोश मोर्चा काढण्यात येणार असल्याचेही सांगण्यात आले आहे.मागण्या मान्य न झाल्यास दि.२ मार्च २०२६ पासून बेमुदत कामबंद आंदोलन करण्यात येईल,असा इशारा समितीने दिला आहे.या आंदोलनाचा परिणाम मोजणी,फेरफार व इतर भूमी अभिलेख संबंधित कामांवर होण्याची शक्यता असून नागरिकांनी सहकार्य करावे असे आवाहन केले आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
गुरुवार, दि. १९ फेब्रुवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com







# शिवजयंती दिनी शिवाजी पार्क येथे शिव जन्मोत्सव

## बुधवारी रात्री निघाली मशाल शोभायात्रा

प्रतिनिधी १९ फेब्रुवारी

**अकोला :** हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती निमित्त शिवाजी पार्क येथे आज सकाळी ६ वाजता छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्मोत्सव सोहळा जल्लोषात साजरा करण्यात आला. शिवजयंती उत्सव आयोजन समितीचे सदस्य तसेच मान्यवर उपस्थित होते.

या नंतर शिवजयंती घरोघरी हे स्पर्धात्मक अभियान राबविण्यात येणार आहे. दुपारी १ वाजता शिवाजी पार्क येथे अन्नदान सेवा होऊन दुपारी ३ वाजता डॉ. आंबेडकर खुले नाट्यगृह येथून



शिवाजी महाराज पार्क पर्यंत भव्य महारॅली निघणार आहे. महारॅलीचे आगमन झाल्यावर सायंकाळी ७ वाजता शिवाजी महाराज पार्क येथे छत्रपती संभाजी महाराज यांच्यावर आधारित 'स्वराज्याचा रक्षक-शिव छावा नाटिका' सादर करण्यात येणार आहे.



बुधवारी रात्री महाराणा प्रताप बागेपासून मशाल रॅली काढण्यात आली. रॅली शिवाजी पार्क मध्ये पोहोचली. महापौर शारदा खेडकर, उपमहापौर अमोल गोगे, नगरसेवक जयंत मसने यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. शिवाजी पार्क मधील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूर्णाकृती पुतळ्याला मानाचा मुजरा करण्यासाठी सकाळ पासून गर्दी होत आहे. महाराजांची जयंती शहरासह जिल्ह्यात अतिशय उत्साहाने साजरी केली जात आहे. न्यू तापडिया नगरात छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा तसेच परिसर सुशोभित करण्यात आला



आहे. शहरातील चौकाचौकात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमांचे पूजन केले जात आहे. मंगलवाद्यांचा गजर, महाराजांची थोरवी सांगणारे पोवाडे यामुळे शहर दणाणत आहे.

# श्री श्याम फाल्गुन उत्सवात भजनांनी रंगली भक्तीमय मैफल



प्रतिनिधी १९ फेब्रुवारी

**अकोला :** गीता नगर येथील रामदेवबाबा-श्यामबाबा मंदिरात 'श्याम के दिवाने' समूहाच्या वतीने भव्य श्री श्याम फाल्गुन उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी खाटू धाम येथील प्रसिद्ध भजन गायिका श्रुती शर्मा तसेच कोलकाता येथील भजन गायक देवांगा खंडेलवाल यांनी एकापेक्षा एक राजस्थानी भजनांची अप्रतिम प्रस्तुती देत उपस्थित श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

उत्सवादरम्यान श्री श्याम प्रतिमेची आकर्षक झांकी, सुंदर पुष्पसजावट, फाल्गुन खेळ आणि विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न झाले. या भक्तीमय सोहळ्याला शहरातील विविध भागांतील नागरिकांनी मोठ्या संख्येने



उपस्थित राहून कार्यक्रमाचा आनंद घेतला.

फाल्गुन उत्सव व अष्टम प्रतिष्ठा दिनानिमित्त भजन संध्या

अकोला : गीता नगर येथील श्री रामदेवबाबा व श्री श्यामबाबा मंदिरात फाल्गुन उत्सव तसेच मंदिराच्या अष्टम प्रतिष्ठा दिनानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. फाल्गुन सुदी द्वितीया या



पावन मुहूर्तावर आज गुरुवारी सायंकाळी ६ वाजता नागपूर निवासी भजन सम्राट उज्ज्वलजी खाकोलिया यांच्या भव्य भजन संध्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या भक्तीमय सोहळ्याचा मोठ्या संख्येने लाभ घेण्याचे आवाहन मंदिर समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# नरनाळा महोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी दखल च्या टीमचा सन्मान

## ♦ दखल चे संस्थापक प्रदीप गुरूखुद्दे आणि सहकाऱ्यांचे कौतुक



प्रतिनिधी १९ फेब्रुवारी

**अकोला :** नरनाळा महोत्सवाचे आयोजन करण्या करिता सतत पाठपुरावा करून सक्रिय सहभाग घेतला. महोत्सव पूर्णत्वास नेण्याकरिता दखलने सक्रिय सहभाग घेतला. त्याबद्दल प्रशासनाने दखल टीमचे कौतुक करून सन्मानित केले. यावेळी दखलचे संस्थापक अध्यक्ष श्री प्रदीप गुरखुद्दे सह महेश देशमुख, शशिकांत हांडे, ठाकूरदास चौधरी, दिलीप हांडे आणि नंदकिशोर दाभाडे यांना सन्मानित करण्यात आले. १५ ते १७ फेब्रुवारी दरम्यान नरनाळा महोत्सवाचे भव्य आयोजन करण्यात आले होते. महोत्सवाला अतिशय चांगला प्रतिसाद मिळाला. दखल टीमने या भव्य आयोजना बद्दल जिल्हाधिकारी वर्षा मीना, उपवनसंरक्षक राहुलसिंग तोलिया, उपविभागीय अधिकारी मनोज लोणारकर तसेच अकोटचे तहसीलदार चव्हाण यांचे आभार मानले.

# आमदार साजीद खान पठाण यांनी पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्यासोबत घेतली कायदा सुव्यवस्था बैठक



प्रतिनिधी १९ फेब्रुवारी

**अकोला :** आमदार साजीद खान पठाण यांनी एसपी कार्यालयाच्या विजय सभागृहात पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या सोबत कायदा व सुव्यवस्थेचा आढावा घेतला. शिवजयंती आणि पवित्र रमजान महिन्याच्या पार्श्वभूमीवर कोणताही अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी विशेष उपाययोजना करण्याची मागणी त्यांनी केली.

रमजानच्या काळात मुस्लिम समाजाला खरेदीसाठी रात्रीच्या वेळी आवश्यक परवानगी देण्यात यावी, अशी विनंतीही करण्यात आली. तसेच, कोणत्याही प्रकारचा तणाव किंवा गैरसमज पसरू नये यासाठी सर्व ठाणेदारांनी समन्वयाने काम करावे, अशा सूचना प्रशासनाला देण्यात आल्या. बैठकीनंतर पोलीस प्रशासनाने पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन दिले आहे. याप्रसंगी माजी नगरसेवक मो. इरफान, मो. युसूफ, मंजूर अहमद तसेच वरिष्ठ पोलिस अधिकारी उपस्थित होते. दोन मोठे उत्सव एकाच वेळी येत असल्याने प्रशासनाकडून संवेदनशीलता, सतर्कता आणि योग्य समन्वयाने काम करण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

# नाईक होमिओपॅथीमध्ये होतोय असाध्य आजारांवर उपचार

## ♦ ॲडव्हान्स होमिओपॅथी ट्रीटमेंट रुग्णांसाठी फायदेशीर

प्रतिनिधी १९ फेब्रुवारी

**अकोला :** येथील प्रसिद्ध डॉ. नाईक होमिओपॅथीमध्ये थायरॉईड, लठ्ठपणा, ॲसिडिटी, गुडघेदुखी, कंबरदुखी, संधिवात, मायग्रेन सारख्या असाध्य आजारांवर उपचार घेऊन रुग्ण आता निरोगी जीवन जगत आहेत. ॲडव्हान्स होमिओपॅथीच्या उपचारामुळे आतापर्यंत हजारो रुग्णांना मोठा फायदा झाला आहे. गेल्या ४० वर्षांपासून डॉ. नाईक होमिओपॅथीमध्ये शरीराच्या सर्व आजारांवर संपूर्ण आणि यशस्वी उपचार केले जात आहेत. ज्या रुग्णांना इतर ठिकाणी उपचार घेऊनही फरक पडलेला नाही, अशा रुग्णांनी एकदा येथे नक्कीच भेट दिली पाहिजे. अधिक माहितीसाठी रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक ९१७५९५७१२९ किंवा ९१३००१६१२९ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधू शकतात, तसेच Naikhomoeopathy.com (Youtube) वर अधिक माहिती मिळवू शकतात. येथे उपचार घेऊन पूर्णपणे बऱ्या झालेल्या एका




महिला रुग्णाने आपला अनुभव व्यक्त केला आहे.

माझे नांव रोशनी, मला नाईक होमिओपॅथी येथे येण्या अगोदर थायरॉइडचा त्रास होता. त्यामुळे वजन वाढत होते.

मायग्रेनचा त्रास होता. खुप पॅनिक व्हायचे, चिडचिड व्हायची, नाईक होमिओपॅथी येथे उपचार घेत असताना दोन महिन्यात माझे ४ किलो वजन कमी झाले. मायग्रेनचा त्रास कमी झाला. चिडचिड, पॅनीक होणे कमी झाले. एकुण नाईक होमिओपॅथी औषधांन मी समाधानी आहे.


# संत रूपनाथ महाराज यात्रेत बँड पथक ढोल नगारे टाळांच्या गजरात दुमदुमली दहीहांडा नगरी


## ३२ दिंड्यांचा सहभाग, १०० क्विंटल महाप्रसादाचे आयोजन

पवन बेलसरे १९ फेब्रुवारी

**अकोट:** जिल्ह्यातील भाविकांचे श्रद्धास्थान असलेले दहीहांडा गावचे ग्रामदैवत संत श्री रूपनाथ महाराज यात्रेनिमित्त श्री शिवपुराण महाकथा, दहीहांडी व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. ५ फेब्रुवारीला तीर्थस्थापना ते मंगळवार १७ पर्यंत विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. भाविकांची मोठी उपस्थिती होती.

सांप्रदायिक सप्ताहामध्ये विधीवत प्रथेनुसार पहाटे चार वाजता पासून दररोज श्रींची आरती व काकडा, खंजिरी भजन स्पर्धा, कराओके गीत गायन, राष्ट्रीय कीर्तन, हास्य जत्रा, शिव महापुराण भक्तीरंग आदींचे आयोजन करण्यात आले. शिव महापुराण कथा वाचक गणेश महाराज शेटे यांच्या कथेला भाविकांनी भरभरून प्रतिसाद दिला. संत रुपनाथ महाराजांच्या मंदिराचे भव्य पटांगण, प्राचीन काळातील चार







शिवलिंग, नागदेवता, महाकाय नंदी, अष्ट धातूची संत रुपनाथ महाराजांची मूर्ती, सजवलेले प्रवेशद्वार, समोर ब्रिटिशकालीन दीपमाळा व हनुमंतराय. मोठा सभा मंडप फुलमाळांनी सजवण्यात आला होता. त्यावर रोषणाही केली होती. १७ ला सर्व गावांमध्ये मुख्य प्रदक्षिणा रोडवर ग्राम स्वच्छता करण्यात आली. रस्ते रांगोळ्यां फुलांनी सजवलेले होते. श्रींच्या यात्रा मिरवणुकीमध्ये महिलांच्या टाळ मृदुंगाच्या दिंड्या, फुगड्या व कीर्तनाच्या तालावरील नृत्य करीत पुढे जात होत्या. ढोल, नगारे, बँड पथक, भजने, बासरीचा सूर व झांज टाळाच्या गजरात संत नगरी दुमदुमून गेली होती. मिरवणुकीतील श्रींची पालखी व सजवलेला रथ भाविक हाताने ओढतात. या रथावर लहान मुला बाळांचे डोके टेकून त्यांचा अंगारा लावण्याची ग्रामदेवतेची पौराणिक प्रथा प्रत्येक कुटुंबात आजही श्रद्धेने पाहायला मिळते. मिरवणूक मंदिर परिसरात आल्यावर आरती झाली. पूजन करून श्रीची मूर्ती लहान मुले व भाविक पटांगणामध्ये लोटांगण घेऊन त्यांच्या अंगावरून मूर्ती मंदिरात नेण्याची श्रद्धेची रूढी परंपरा इथे पाहायला मिळते. काल्याचे किर्तन होताच महाप्रसादाला सुरुवात करण्यात आली. १०० क्विंटल महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. मिरवणुकीतील दिंडीकऱ्यांचे शाल, श्रीफळ व मानधन देऊन सत्कार करण्यात आला. यात्रा महोत्सवाला आमदार रणधीर सावरकर यांची उपस्थिती होती. संस्थानचे अध्यक्ष गणेश पोटे यांचे महाप्रसादाची पंगत वाढण्याचे नियोजन उत्कृष्ट होते. १०० क्विंटल महाप्रसाद वितरणात मुस्लिम बांधवांसह सर्व समाज बांधवांचे एकोप्याचे दर्शन यात्रेचे प्रतीक ठरले. दहीहांडा पोलीस स्टेशनचे ठाणेदार गोपाल ढोले यांच्या मार्गदर्शनात बंदोबस्त होता. यात्रा महोत्सवासाठी परराज्यातील महिला व भाविकांची मोठी उपस्थिती होती.

वाढदिवस शुभेच्छा
पश्चिम विदर्भातील सर्वाधिक लोकप्रिय चॅनल आरआरसी नेटवर्क व सिटी न्यूज सुपरफास्टचे प्रतिनिधी
पवन इंगळे
यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा
RRC NETWORK
सिटी न्यूज सुपरफास्ट

वाढदिवस शुभेच्छा
पश्चिम विदर्भातील सर्वाधिक लोकप्रिय चॅनल आरआरसी नेटवर्क व सिटी न्यूज सुपरफास्टचे अकोट विशेष प्रतिनिधी
राजेश सोळंके
यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा
RRC NETWORK
सिटी न्यूज सुपरफास्ट

वाढदिवस शुभेच्छा
पश्चिम विदर्भातील सर्वाधिक लोकप्रिय चॅनल आरआरसी नेटवर्क व सिटी न्यूज सुपरफास्टचे पुसद तालुका प्रतिनिधी
प्रा.आकिब रिजवी
यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा
RRC NETWORK
सिटी न्यूज सुपरफास्ट

CLASSIFIED

विक्री किंवा भाड्याने
डॉक्टर, हॉस्पिटल, बँक, कंपनी, ऑफिस करीता उपयुक्त.
१ मजला आणि २ मजला
1800 चौरस फूट हॉल
रामेश्वर अपार्टमेंट,
श्री राजराजेश्वर कन्स्ट्रक्शन
जिल्हा परिषद शाळा क्र. 3 समोर, जय हिंद चौक, जुने शहर,
सुसज्ज सर्व सुविधा युक्त मुख्य रस्त्यावर आहे.
9623497321
9421940975

भाड्याने देणे आहे
२५X ६० चा हॉल व अट्याच दोन वॉशप आहे
पत्ता : गिरीनगर आप्पा दुध डेअरी जवळ, जुना RTO ऑफीस रोड, अकोला
(आप्पा दुध डेअरीच्या बाजूला)
मो. 9922670850
9309379112

फ्लैट फ्लैट फ्लैट
नवीन कंस्ट्रक्शन रेडी टू मूव फ्लैट
अमरावतीच्या मधोमध तेही आपल्या बजट मधे फक्त १६,९९,९९९/- मधे नवीन बांधकाम मधे फ्लैट
पत्ता:- देसाई लेआउट, गणेश कॉलोनी जवळ राजापेठ, अमरावती
अधिक माहिती साठी संपर्क
मो. 8468872250
8788432278

प्लाट प्लाट प्लाट
नवीन लेआउट तपस्या नगरी
फक्त २,५०,०००/- च्या ३ सोप्या किस्ती ११ महिने मुदत मधे प्लाट
पत्ता :- मौजे मालेगाव, हनुमानगडी समोर, छत्री तलाव रोड दस्तुर नगर अमरावती
अधिक माहिती साठी संपर्क
मो. 8263923606
7757905649

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ▪ संपर्क – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK